# किसान

लेखक

ना. के. महाजन

प्रकाशक

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

★

किंमत २ रुपये

[ सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन ]

प्रथमावृत्ती १९४६

★

[ मुनशी प्रेमचंदच्या 'गोदान'वरुन ]

प्रकाशक—शंकर वामन कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.
मुद्रक—जनार्दन गणेश जोशी, मोटार प्रिंटिंग प्रेस, ३९४ सदाशिव, पुणे २.

# आमचें प्रकाशन

## कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| १ | जागृति-ना. के. महाजन | ६ |
| २ | झुंज– (जप्त) | ६ |
| ३ | सीमा–आळंदकर | २ |
| ४ | सूड–वा. वि. जोशी | २ |
| ५ | धुमकेतु–विप्लवी चामुण्डराय | ३ |
| ६ | मावळता चंद्र–बा. भ. बोरकर | २ |
| ७ | माळरानांत–गीता साने | २ |
| ८ | धुकें आणि दहिंवर–,, | २ |
| ९ | बेसूर संगीत–प्रभावळकर | २ |
| १० | मुचकुंद दरी–वि. ल. बर्वे | २ |
| ११ | भावनेच्या भोवऱ्यांत | २।। |
| १२ | पन्नास वर्षानंतर शं.वा.कुलकर्णी | ३ |
| १३ | आंदोलन-दा. कृ. पैठणकर | ३ |
| १४ | निसर्गाकडे-चंद्रकांत काकोडकर | ३ |
| १५ | आई-अनु. बा. द. सातोस्कर | ५ |
| १६ | छायानट-अनु. रत्नप्रभा रणदिवे | ४।। |
| १७ | मीलन–सा. घ. कंटक | २।। |
| १८ | मित्र आणि मैत्रिणी–स. हृदय | ३ |
| १९ | लढाई संपल्यावर–साधले | ५ |
| २० | मुक्तात्मा–मालखोलकर | ४ |
| २१ | शाप ,, | २।। |
| २२ | दुहेरी जीवन ,, | २।। |
| २३ | सुकलेलें फूल-पु. य. देशपांडे | २ |
| २४ | डॉ. कोटनीस–म्हात्रे | २ |

## लघुकथा संग्रह

| | | |
|---|---|---|
| १ | माझा देश व इतर गोष्टी-प्रो. फडके | २ |
| २ | लाल झेंडा-ग. कृ. गणेशजोशी | २ |
| ३ | बाभळवनांत-शामराव ओक | २ |
| ४ | लेनिन आणि इतर गोष्टी–पैठणकर | २।। |
| ५ | राजकीय सत्यकथा-शरच्चंद्र गुंण्ये | १। |
| ६ | अनीतीचें दिव्य–सरदेसाई | २। |
| ७ | एक होता राजा-कमल फडके | २ |

## इतर

| | | |
|---|---|---|
| १ | पितापुत्र संबंध–य. ग. दाते | ४। |
| २ | उद्योगांतून उत्कर्ष-अनु. दाते | ।। |
| ३ | मित्र हो!–प्रो. फडके | २ |
| ४ | माझीं गाणीं जी. एन्. जोशी | १। |
| ५ | उद्याचें जग–पोतनीस | २ |
| ६ | साम्राज्य व स्वराज्य-शिखरे | १ |
| ७ | साहित्य आजि साहित्यिक–ह. वि. देसाई | २ |
| ८ | जळते शरीर– ,, | १।। |
| ९ | जीवनासाठीं– ,, | १ |
| १० | अर्ध्या वाटेवर– ,, | १ |
| ११ | सोन्याची माती–स. हृदय | २ |
| १२ | हवन–प. त्रि. सहस्रबुद्धे | ।= |
| १३ | जळतीं घरें-व्यं. श. वकील | ।।। |
| १४ | विशाल संसार– ,, | १।। |
| १५ | कला कौस्तुभ–सरमळकर | १।। |
| १६ | आजचें स्वराज्य-वा. वि. जोशी | ।= |
| १७ | आपली पृथ्वी–हडप | ३ |
| १८ | दैवीं सिद्धांत–शिंदे | ३ |
| १९ | सुभाषवाद–ग. त्र्यं. माडखोलकर | १। |
| २० | दुसरें क्रांति युद्ध-अॅ. भालेकर | ३ |
| २१ | माझे आवडते लेखक–माडखोलकर | १।। |

२२ लाटांचे तांडव–कालेलकर १॥
२३ बाहेरचा वारा–शं. द. भोसले ॥।

## गांधी साहित्य

१ अखंड भारत १॥
२ अहिंसा दर्शन १॥
३ गांधीवादावरील आक्षेप व त्यांचीं उत्तरें-गो. रा. कुलकर्णी १॥
४ गांधीजीच कां?-पु. य. देशपांडे १॥
५ अहिंसेची साधना अनु–वामन चोरघडे १॥
६ गांधीजींची धर्मनीति १॥
७ महात्माजींची विलायतची यात्रा १॥
८ गांधींचे नेतृत्व–देशपांडे १॥

## अमर ज्योति वाङ्मय

१ मडक्यांतील न्याय ।≡
२ जलदेवतेचा न्याय ।≡
३ नशिबाची परीक्षा ।≡
४ माणसाचें शेपूट ॥=
५ प्रफुल्लचंद्र ।≡
६ गीत ज्योति ॥=
७ शूरांचा गांव ।≡
८ कड्यावरील गाडी ।≡
९ अजिंक्य पंडित ।≡

## बाल वाङ्मय

१ आई–माधव कामत ।–
२ विक्रमाची साडेसाती ताराबाई मोडक ॥
३ जादूचा घोडा ,, ।
४ सवाई विक्रम ,, ।–
५ गारांचा पाऊस–शं. रा. देवळे ।
६ गपूदादाचा लाकडदांड्या ताराबाई मोडक ।–
७ वानरांची सर्कस-वसंत वैद्य
८ प्रवासी गलिव्हर-दीनानाथ म्हात्रे ।=
९ तीन पण व इतर गोष्टी-बेंबळकर ।–
१० तुतारीवाला– ,, ।–
११ अजित कुमार-ताराबाई जाधव ।
१२ रत्न कंकण ,, ।
१३ पालवी–वसंत वैद्य ।–
१४ मजेदार कथा–यदुनाथ थत्ते ।=
१५ नूतन नीतिकथा भाग १ गो. वा. पंडितराव ॥=
१६ ,, भा. २ रा ,, ॥=
१७ हिरवा पक्षी-दीनानाथ म्हात्रे ।–
१८ चिमण्या कळ्या भाग १ ला (मालतीबाई दांडेकर) ।–
१९ ,, भा. २ रा ,, ।–
२० सुनंदा–अक्कलकोटकर ।–
२१ एका रात्रींत देऊळ-यदुनाथ थत्ते ॥
२२ तान्या बान्या-ग.कृ.गणेशजोशी ।–
२३ जाइचा मत्र सौ. विद्यासिधपे ।–
२४ पिंजऱ्यातील प्राण-रं. म. जोशी ।
२५ चिमण्यांची चिंवचिंव सौ. शांताबाई पेंडसे ।
२५ रोझा–दीनानाथ म्हात्रे ।
२६ बुकरटी वाशिंग्टन ,, ।–
२७ बिरबल १ व २ प्रत्येकी ॥
२८ सुलभ महाभारत भाग १ ते ६ प्रत्येकी ॥

## शिशु साहित्य

१ कांचन गंगा–सौ. बाळिंबे ।
२ निळें आकाश– ,, ।–
३ रुपेरी किरण– ,, ।
४ सात तारका– ,, ।

# किसान

## १

वऱ्हाडांत चिखली नांवाची एक छोटीशी जहागीर आहे. ह्या जहागिरींत सेमरी व बेलारी या नांवाचीं दोन गांवें आहेत. सेमरी गांवात जहागीरदार राहात असे व बेलारी गांवात गरीब शेतकरी राहात असत. बेलारी गांव साधारणत १०० झोपड्यांचं खेडं होतं. या खेडेगावांत मुख्य धंदा शेतीचा व त्यांतल्यात्यांत ऊंस पिकवावयाचा.

जमीन काळीभोर व फार सुपीक असे. पाऊसही मुबलक. त्यामुळें उंसाचं भरगच्च पीक येत असे. सारे शेतकरी उंसाची लागण करीत; ऊंस तयार झाला म्हणजे तो आजुबाजूच्या बाजारांत नेऊन विकीत.

तोताराम नांवाचा एक गरीब शेतकरी बेलारींत राहात होता. होती दोन-तीन बिघे जमीन त्याच्याजवळ. तो, त्याची बायको व तीन मुलें एवढा त्याचा संसार. मुलाचं नांव होतं, झुमरु, मोठ्या मुलीचं सोनी व धाकटीचं रुपा. पत्नीचं नांव होतं धनिया.

तोता स्वभावानं गरीब, धर्मनिष्ठ व फार भोळा होता. बिचारा कधीं खोटं बोलत नसे. कोणाला फसवीत नसे. कोणीहि अडचणींत असला तरी तो त्याच्या मदतीला धांवून जाई.

त्याला दोन भाऊ होते. त्यांच्या लहानपणींच मातापिता मृत्युमुखीं पडले असल्यामुळें तोता व धनि यांनींच त्यांचं लालन पालन केलं होतं! त्यांना लहानाचं मोठं केलं होतं, त्यांचीं लग्नें करून दिलीं

होतीं, व त्यांच्या आईबापांची उणीव त्यांनीं स्वतःच्या वात्सल्यानं भरून काढली होती.

पण लग्न झालं कीं सारींच माणसें बिथरतात. हिरा व दलपत असेच बिथरले व त्याच्यापासून विलग राहूं लागले. दोन्ही भाऊ भांडण करून वेगळे संसार करूं लागले, त्याचं तोताला भारी वाईट वाटे. पण त्याच्या सुखांत आपलं सुख असं समजून तो गप्प बसला.

एके दिवशीं जमीनदार आप्पासाहेबांच्या इथं भागवत सप्ताह होता. वेठीला धरणं तर जमीनदारांच्या पांचवीला पुजलेलं. त्यांनीं तोताला हजर रहायचा हुकूम दिला. धनीच तो! तोता आपलं कामधाम सोडून निघाला.

जेष्ठ महिना होता तो. सपाटून ऊन तापलं होतं. तसा उन्हांतून अनवाणी पायानं तोता चालला होता. हातांत एक जाड लाठी होती; आणि डोळ्यांत विचारचक्र चालू होतं.

तोता गरीब होता. दोन-तीन बिघे जमीनींची कशीबशी मशागत करूनं, तो आपला चरितार्थ जेमतेम चालवीत होता. पण त्याच्या अंतःकरणांत एक विक्षिप्त महत्त्वाकांक्षा होती. बँकेंत पैसे जमा करणें किंवा इस्टेट विकत घेणें ही त्याची लालसा नव्हती. तो हिंदु होता. व हिंदुधर्मांत गाय, पवित्र, गाय म्हणजे माता! ही माता ज्याच्या इथं तो भाग्यवान्! आई नाहीं तें घर काय कामाचं! जणू प्राणावाचून शरीर!

अजून त्याला मातेला घरीं आणण्याचं सामर्थ्य आलं नव्हतं! त्याच्याजवळ इतके पैसे कुठून येणार? पण त्याला गाय हवीशी वाटत होती! गाय विकत घेऊन आपल्या आंगणांत बांधलेली पाहणं हीच त्याची सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा होती! त्याच्या आयुष्याचं हें सर्वांत मोठं ध्येय होतं!

आणि ती गाय १।२ शेर दूध देणारी हडकुळी नव्हे ! तर चांगली ५।६ शेर दूध देणारी. दिसायला कशी मस्त, नी ऐटबाज. कोणीहि बघितलं कीं, त्यानं वाहवाच केली पाहिजे.

पण अशी गाय आपल्याला मिळणार कशी ?

अशा विचारांत तो चालला होता. तितक्यांत समोरून भोला येतांना दिसला. भोला गुराखी होता. आणि त्याच्याच मालकीच्या गाई होत्या. तो गाई बैल विकत घेई. त्यांना खाऊं घालून मस्त करी, व चांगली किंमत आली कीं विकून टाकी. त्याच्याजवळ तोताला हवी होती अशी एक गाय होती. नुकतीच मोल घेतली होती त्यानें. दिसायला मोठी लंबी चवडी, लाललाल, व खूप दूध देणारी, पाहतां पाहतां मन हरून घेणारी.

ती गाय पहातांच तोताच्या हृदयांतली गोमातेबद्दलची लालसा उसळून उठली. त्यानें त्या गाईच्या पुठ्ठ्यावर थाप मारली, डोक्यावरून हात फिरविला, आणि शेपटीला हात लावून प्रणाम केला.

त्यानं विचारलं ' भोला छान गाय आहे ही. नाहीं का ? ' भोला म्हातारा होत आला होता. साधारण ५० पर्यंतचं वय झालं होतं. खोकलत तो म्हणाला ' तर ! तर ! लई बेस ! अरे आपले जमीन-दारसाहेब १०० रु. ला मागताहेत आज ! आहेस कुठं ? ' आश्चर्य वाटून तोता म्हणाला ' काय ? शंभर रुपये ? '

तिथं नजीकच पाणी सांचून एक तळं तयार झालं होतं. तिथल्या हिरवळीवर ते बसले व चिलमी फुकंत गप्पा रंगूं लागल्या.

भोलाची बायको नुकतीच मरण पावली होती. बिचारा दुःखी होता. म्हातारवयांत बायको मरणं म्हणजे केव्हांही आपत्ती.

म्हातारवयांत बायको म्हणजे काठी. बायको म्हणजे विसावा. ही काठी हा विसावा नाहींसा झाला म्हणून भोला दुःखी कष्टी

झाला होता. तरी तो म्हणत होता कीं, ही काठी पुनः मिळवलीच पाहिजे. उरलेलं आयुष्य बायकोशिवाय जायचं कसं ?

तोता हृदयाचा फार प्रेमळ. त्याचं दुःख बघून त्यालाहि वाईट वाटलं. त्यानं त्याचं सांत्वन केलं, आणि जमल्यास त्याच्या लग्नाची खटपट करावयाचंहि कबूल केलं !

भोला खुष झाला. त्याला तोताची महत्त्वाकांक्षा माहित होती. त्यानं आपली गाय त्याला देऊं केली. सौदा झाला ८० रुपयांचा. तोताजवळ एक दिडकीहि नव्हती. तो मागेपुढें पाहूं लागला. मन म्हणत होतं, ' संधी चालून आली. घेऊन जा गाय घरीं ! ' पण दुसरं मन म्हणत होतं ' कुठून देणार इतके पैसे. '

त्यानं गाय न्यावयाचं नाकारलं ! पण भोला ऐकेना. तो म्हणाला, हंगामांत दे. नगदी मागतेय कोण !

' विचार करून सांगतों ' असं म्हणून खुषींत तोता पुढें निघून गेला.

तोताला मोह आवरला नाहीं. दुसरे दिवशीं गाय घरीं आणावयाचें ठरवून त्यानें झुमरूला भोलाकडे पाठवून दिलें.

भोलाला एक मुलगी होती. बिचारी विधवा होती. मोठी देखणी व सुंदर होती. भोलाच्या घरचा कारभार तीच पहात असे.

झुमरु गाय घेण्याकरतां भोलाकडे गेला तेव्हां त्याचीन् गोदूची ओळख झाली. तिच्या सौंदर्यावर तो मोहित झाला. तिला पाहतांक्षणीच त्याचं तिच्यावर प्रेम जडलं.

गाय नेण्याकरतां तो आला. गाय घेऊनहि गेला, पण हृदय गमावून बसला.

इकडे गाय घरीं येणार, आज गोमातेचं दर्शन होणार म्हणून तोता, धनिया खूप आनंदांत होतीं. कितीतरी दिवसांनी त्यांचं स्वप्न

खरं ठरलं होतं ! ज्या आशा त्यांच्या हृदयांत चिरंतन चेतत आल्या होत्या, त्या आज पूर्ण होणार होत्या ! भल्या पहाटेच उठून धनियानें सारं घर झाडून, सारवून स्वच्छ करून ठेवलं. गायीकरतां घासचारा जय्यत तयार करून ठेवला. पण तोता विचारांत होता, गाय बांधायची कुठें ?

त्याचं घर म्हणजे एक लहानशी झोंपडी होती. असेल एक-दोन खोल्यांची. पिछाडीला आंगण होतं. आणि समोर थोडीशी मोकळी जागा. तिथंच तो शेतीचे बैल बांधीत असे.

सायंकाळच्या सुमार, खूप मुलांच्या घोळक्यांत, गाय घेऊन झुमरु घरीं आला. मोठी ऐटबाज गाय पाहतांच तोताच्या नेत्रांतून भक्ति ओसंडूं लागली. त्यानं तिच्या गळ्याला मोठ्या श्रद्धेनं हात टाकले. धनिया चुलीजवळ पीठ मळत बसली होती. तशाच हातानं ती बाहेर आली, आणि गाय बघतांच धांवतच आंत गेली. एका जुन्या फाटक्यातुटक्या लुगड्याची चिंधी घेऊन येऊन ती तिनं गायीच्या गळ्यांत बांधली. न जाणों दृष्ट झाली तर !

काळी चिंधी बांधून झाल्यावर तिनं तोताला विचारलं.

' अरे असे उभे कां ? कांहीं बांधायची व्यवस्था कराल कीं नाहीं ? '

' पण बांधू कुठं ? '

' कुठं काय ? मागीलदारीं अंगणांत बांधा ! '

' जागा नाहीं तिथं ! वितभर अंगण, गाय मावणार कशी ! '

' मावते ! तुम्हीं जा बघूं आंत, आणि एक खुंटा गाडून घ्या ! '

खरी गम्मत अशी होती कीं, तोताला गायीबद्दल जितकं प्रेम होतं, तितकीच तिचं प्रदर्शन करावयाची लालसा होती. त्या इवल्याशा, दरिद्री खेडेगांवात गाय बाळगणं एक मोठं श्रीमंतीचं लक्षण होतं !

गाय समोर दरवाज्यावर बांधली म्हणजे जाणाऱ्या येणाऱ्याला तिचं दर्शन होईल, मग जो तो धांवून त्या देखण्या गाईकडे बघून तोताच्या ऐश्वर्याचा हेवा करूं लागेल, आणि तोताला असलाच मोठेपणा हवा होता. पण धनिया गाईला देवतेसमान लेखीत होती! तिच्या नजरेनें गाय म्हणजे साक्षात् देवी. ह्या गोमातेला बाहेर बांधायचं म्हणजे काय? कोणी चोरून नेली म्हणजे? आणि जाणाऱ्या येणाऱ्याची दृष्ट नाहीं का लागणार? तिला शक्य असतं तर धनियानें गाय सात पड्यांत लपून ठेविली असती. पण ती अशक्य गोष्ट होती म्हणून तिनं नाइलाजानें गाय मागच्या अंगणांत नेऊन बांधविली.

लहानशा गावांत कोणतीहि बातमी फैलावयास उशीर लागत नसतो. हां हां म्हणतां तोतानें गाय आणली ही बातमी साऱ्या गांव-भर पसरली. गांवचे चार शिष्ट बुद्रुक, पाटील, पटवारी, कुलकर्णी वगैरे सारे जण गाय बघावयास आले. आणि गाय पाहून तोंडफाटे-पर्यंत त्यांनी तिची स्तुती केली. जो तो गाय बघून खूष होत गेला, व तोताला आशीर्वाद देत घरीं गेला.

पण आले नव्हते ते दोघे त्याचे भाऊ हिरा व दलपत.

तोतानें गाय विकत घेतली, हें त्यांना सहन झालं नव्हतं! भाऊ-बंदकीमुळें तोताचं ऐश्वर्य त्यांना पाहवल्या गेलं नाहीं! मत्सरानं हिराच्या अंतःकरणांत पेट घेतला होता.

× × ×

तोता जितका भोळा होता तितकाच दयार्द्र अंतःकरणाचा होता. त्याला स्वतःच्या भावाची आठवण झाली. या अशा आनंदाच्या दिवशीं त्यांची कमतरता व उदासीन वृत्ति त्याला फार जाणवली. ते दोघे अलग राहात असले म्हणून काय झालें? रक्ताचं

नातं तर तुटलं नव्हतं ना ? त्यानेंच त्यांचं मुलांसारखं पालन केलं नव्हतं का ? ते त्याचा द्वेष करीत असले तर करूं देत ? पण त्यांनी द्वेष केला म्हणून आपण त्यांचा तिरस्कार केला पाहिजे असं थोडंच आहे ? अरे, कांहीं झालं तरी आपआपलं कर्म आपल्याच सांगाती राहातं ना ?— नाहीं ते आले, तर आपण जाऊंया —

तोता उठला, आणि त्यांच्या घरांकडे निघाला. हिरा व दलपतच्या झोपड्या एकमेकाच्या नजीकच होत्या. रात्र झाली होती आणि आसमंतांत अंधार होता. तोता त्यांच्या घराजवळ आला तेव्हां ते दोघे भाऊ आपसांत गप्पा मारीत बसले होते. तोताची चाहूल आली नाहीं त्यांना. तोता नजीक आला, तेव्हां त्यांच्या गप्पा त्याला ऐकूं आल्या, आणि तो जागच्या जागींच थांबला.

हिरा जोरजोरांत बोलत होता— ' आम्हीं एकत्र होतों तेव्हां तोतानें बकरीसुद्धां मोल घेतली नव्हती ? ' ' पण आज ८० रुपयांची गाय विकत आणली—' मध्येच दलपत म्हणाला.

' काय बोलतोस तूं हें हिरा ? तोतानें एक एक पैचा हिशेब दिला आहे. तो कशाला वडीलोपार्जित धन लपवून ठेवील ?—

' तुमचा विश्वास नाहीं, पण माझा मात्र आहे. तुम्हीं कांहीं म्हणा ही तर जुनीच कमाई आहे—'

' पुरावें नसतांना कोणावर असा आळ घेणं योग्य नव्हे हिरा ? '

' हिरा उसळून म्हणाला ' ' पुरावे नाहींत ! असं सांगा दादानी हे रुपये आणले कोठून ? त्यांच्याजवळ जेवढी जमीन आहे तेव्हढीच आपल्या जवळ आहे ? त्याचं उत्पन्न आपल्या इतकंच. ना जास्त ना कमी. मग आपल्याजवळ विष खायलासुद्धां पै नाहीं, आणि तो मात्र मारे गाय विकत आणतो !—'

' अरे उधार आणली असेल ?—'

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

' उधार ? भोला उधार उसनवार करणारा मनुष्य नाहीं दलपत !

' तूं कांहीं म्हण हिरा, पण गाय मोठी सुंदर आहे—'

गाईची स्तुति ऐकून हिरा अधिकच भडकला. तावातावानं तो गर्जला—' बेईमानाचं धन, जसं येतं तसंच नाहीसंहि होतं !

भगवानाची कृपा असली तर ही गाय जास्त दिवस पचायची नाहीं त्याला—

तोताला पुढचं ऐकवेना. झाल्या गेल्या गोष्टी विसरून, बंधुभावानं तो त्यांच्याकडे आला होता. पण हिराचा तो आरोप ऐकून त्याचं हृदय छिन्न विछिन्न झालं, आणि त्यांतून रक्त वाहूं लागलं.

परत जातांना तो मनांत म्हणाला ' हे भगवन्, तूं तर सारं जाणतोस. मी अगदीं निर्दोष आहें—

× × ×

हिरा काय म्हणतोय् तें ऐकून धनिया रागानं चिडून उठली. तोता गरीब किसान असल्यामुळें झगडा त्याला मान्य नव्हता. वर्षानुवर्षं ठुकरला गेल्यामुळें अपमान सहन करावयाची व मेलेलं जीवन जगावयाची शेतकऱ्यांना आदतच असते. पण धनिया मोठी तेज होती. एकदां बिघडली म्हणजे दुसरी चंडीच. त्यामुळें ती संतापानें चवताळून उठली तर खुद्द तोता चूपचाप बसत असे. आपल्यावर केलेले आरोप सहन न होऊन धनिया थेट हिराच्या दरवाजासमोर जाऊन खडी झाली, आणि चिडून म्हणाली तूं आमचं ऐश्वर्य पाहून कां जळतोस हिरा ! अरे तुला लहानचं मोठं केलं, तुझी शादी करून दिली, त्या उपकाराचे हे असे पांग फेडतोस ? अरे कांहीं लाज शरम ? तुझं पालनपोषण मी नसतं केलं तर बेटा आज जिंदा सांपडला नसतास ?

हिरा म्हणाला—' मोठ्या भावाचं कर्तव्यच होतं तें वैनी! आणि शिवाय तुम्हीं मोफत थोडंच पालनपोषण केलं? वडिलांनी इस्टेट तर तुमच्याच स्वाधीन केली होती ना? आणि शिवाय तूं एवढी कशाला ऐट मारतेस वैनी? शिवी शिवाय तर तूं आमच्याशीं बोलतच नव्हती. आणि देऊन देत होतीस काय तर शिळे तुकडे?—'

हिराच्या झूट भाषणामुळें धनिया चवताळून ओरडत म्हणाली.

' जीभ सांभाळ! वाटेल तें खोटं बोलूं नकोस! निमकहराम कुठचा—'

हिरासुद्धां संतापला. बाहेर येत तो गर्जला—

' जातेस कां नाहीं इथून? कां झिंज्या धरून हांकलून लाऊं? काय समजतेस तूं! दांत पाडून टाकीन सगळे? तुला कसली घमेंड आली इतकी? डाकीन—'

घरधनीनीला दिलेल्या गलिच्छ शिव्या ऐकून तोताचं रक्त गरम झालं. समोर येत धमकवणीच्या स्वरांत तो म्हणाला.

' हिरा—'

तिला डाकीण म्हटलं याचा धनियाला फार त्वेष आला. ती तिथंच जमीनीवर बसली व छाती पीटीत आर्त स्वरांत म्हणाली.

' मला मारतो? ठिक तर मार! सर्व दांत पाडून घेऊनच जाईन इथून! अरे झुमरु तूं कुठं आहेस? तुझ्या आईला जोड्यानें मारणार, आणि तूं नुसता बघणार का? मग तूं मुलगा कसचा....तिच्या आरडाओरडीमुळें तोताचा क्रोध भडकून उठला. हिरा घाबरून हट्टूं लागला व त्याची बायको त्याला ओढूं लागली. सारें गांव तमाशा पाहावयास जमलें होतें. तितक्यांत धनिया वाघिणीसारखी चवताळून उठली आणि हिराला जोरानें ढकलून जमीनीवर पाडून ती म्हणाली.

' कां पळून चाललास भागूबाई ? मारतो ना ? मार ! पाहूं तुझी मर्दुमकी ! '

तितक्यांत तोता धांवला, आणि धनियाला पकडून ओढतच घरीं घेऊन गेला.

× × ×

आषाढ सुरू झाल. पहिला पाऊस पडला. गरम झालेली जमीन भिजून चिंब झाली. पेरणीचे दिवस सुरू झाले. शेतकरी आपल्या कामांत निमग्न झाले. तोता व धनिया नुकतेच कामधाम आटोपून गप्पा मारीत बसले होते तोंच झुमरु धांवतच आला आणि घाबऱ्या घाबऱ्या सांगूं लागला—' दादा, ' सुंदरी ( गायीचं नांव ) ला काय झालं ? ती कशीशीच करते.---'

धांवतच ते तिघं गोठ्यांत पोंहोंचले. सुंदरीच्या तोंडांतून फेस बाहेर आला होता. डोळे खोल गेले होते. पोट फुगून आलं होतं, आणि चार पाय पसरून ती पडून राहिली होती. तिची ती अवस्था पाहतांच धनिया जोरजोरानं रडूं लागली. तोता दौडतच पंडित दाता दीनकडे गेला. त्यांनाच काय ते गुरांचे रोग कळत होते. ते आले. सारा गांव आला. गायीला कोणीतरी विष खाऊं घातलें होतें. लक्षणं स्पष्ट होतीं. अर्ध्या रात्रीं सुंदरी मरण पावली.

सुंदरीच्या मृत्यूचं सर्वांत जास्त दु:ख सोनीला व रूपाला झालं. त्या दोघींची तिच्यावर भारी ममता होती. त्याच तिला पाणी देत, चारा टाकीत, भात खाऊं घालीत. सुंदरी मरण पावतांच त्यांनी रडून आकांत केला.

जमा झालेले खेडूत परत गेले. पण प्रत्येक जण स्वत:शीं विचारत होता, कोणी हें दुष्कृत्य केलं ? कोण पापी आहे हा ?—'

हिराला सर्वांत जास्त राग आला. तो सारखा धमकी देत होता, ज्या कोणीं हें कृत्य केलं त्याला आतांच मारून टाकतों '—' त्या रात्रीं तोताच्या मनांत राहून राहून येत होतं—-कोणी सुंदरीला विष खाऊं घातलें असेल बरं ?

घरचा कीं बाहेरचा आहे तो?

## २

दुसरे दिवशीं सकाळीं तोताच्या घरांत एकच धमाल उडून गेली. तोता धनीला मोरे मारपीट करीत होता. धनी त्याला उलटून शिव्या मोजीत होती. दोन्ही मुली तोताच्या पायाला लपेटून गेल्या होत्या. झुमरु बायाचा हात धरून आईचा बचाव करीत होता. पण धनीनें शिवी हासडली कीं पुनः चेव येऊन, हात सोडवून घेऊन, तोता तिला लाथांनी व हातांनी बडवीत होता. पाहतां पाहतां सारं गावं जमा झालं. पण समजूत घालण्याऐवजीं ते तमाशा बघतच उभे राहिले.

पंडीत दातादीननें तोताला धमकावणीच्या स्वरांत म्हटलें ' अरे, पागल झालास कीं काय ? आपल्या घरच्या लक्ष्मीवर असा हात उगारतो होय ?—'

तोता उत्तरला—' पंडीत तुम्हीं ह्या मामल्यांत बोलूं नका. मी आज हिला चांगलाच हात दाखविणार आहें. फार डोक्यावर चढली होय ?—

धनी रडतच चिडून म्हणाली—' पंडीत तुम्हींच पाहा. मी याला आणि याच्या त्या मस्तवाल भावाला जेलमध्यें पाठवीन तेव्हांच उगीच राहीन. याच्या भावानं, त्या हिरानं सुंदरीला विष खाऊं

घातलं, आणि मी ठाण्यांत रपोट करावयास चालली तर हा असा मार ठोक करून राहिला.'

तोता ओरडला—' पुनः काढलीच गोष्ट? तूं बघितलं होतं हिरानं विष देतांना ?—'

' तूं शपथ घे बघूं, कीं, तूं हिराला गाईजवळ उभा असतांना बघितलं नाहींस म्हणून !—

' होय, शपथेवर सांगतों कीं मी, हिरा गाईजवळ उभा नव्हता—'

' मुलाच्या डोक्यावर ठेव हात, आणि उच्चार शपथ—' तोतानें थरथरणारा हात झुमरूच्या डोक्यावर ठेवला आणि शपथ घेतली.

धनीनें जमीनीवर थुकून म्हटलें ' थूं ' तुझ्या जीनगानीवर ! अरे रात्रीं तूंच आपल्या तोंडानं मला सांगितलं कीं, तूं स्वतः हिराला तिथं गाईजवळ उभं असतांना पकडलं ! आणि आतां त्या निमकहराम भावाला वांचविण्याकरतां, झूट बोलतोस. थूं ! अरे माझ्या मुलाचं कांहीं बरं वाईट तर होऊं दे, तुझ्या साऱ्या घराला आग लाऊन देईन. बेशरम कुठचा—

' धनी, तोंड संभाळून बोल, नाहीं तर वाईट परिणाम होईल बघ ?-—'

' वाईट तें काय होणार ? मारून तर राह्यलाच ! मोठा वीर गेला कीं नाहीं ! भावासमोर गोगलगाय बनतो गोगलगाय !

बघ्यांना हळू हळू धनीचं म्हणणं पटलं. हिरानेंच सुंदरीला विष दिलं ह्याबद्दल कोणालाच संदेह राहिला नाहीं. ते सगळे धनीच्या बाजूनें झाले आणि तोताला दाटूं लागले. घाबरून तोता घराबाहेर निघून गेला.

दातादीननें दलपतला विचारलं ' तुला माहीत आहे का, काय झालं तें दलपत ?—'

दलपत म्हणाला ' नाहीं पंडीत. आज आठ दिवस मी घराबाहेर पडलों नाहीं. तोता कांहीं तरी खावयास पाठवीत होता, त्यावरच गुजराण करीत होतों महाराज. हा, काल सकाळीं हिरा माझ्या इथून कुदळ घेऊन गेला--'

'धनी म्हणाली ' बरोबर ! त्याचंच काम आहे हें. कुदळ घेऊन कुठली तरी विषारी मुळी आणून त्यानं ती गाईला खावयास दिली. शंकाच नको--'

या बाबतींत खुद्द हिरालाच बोलवावयाचं ठरलं. पण हिरा घरीं नव्हता. मोठ्या पहाटेस पांच रुपये घेऊन पळून गेला होता. त्याच्या पळण्यानें सर्वांचीच खात्री झाली.

तितक्यांत दरोगासाब येऊन हजर झाले. सर्वांना दमदाटी करूं लागले. म्हणाले ' सर्वांच्या घरांची तलाशी घेतों. आतां ' बीख देणारा गांठतों आणि जेलमध्यें पोंहोंचवतों--'

दरोगानें हिराच्या घराची झडती घ्यावयाचं ठरविलं! तोताला नाहीं आवडलं तें! हिरा काय न तो काय एकच! मग तो उभा असतांना हिराच्या घराची झडती झाली तर भलतंच कांहीं तरी ' झंगट ' उत्पन्न व्हावयाचं—

दातादीननें हळूच सांगितलं. दरोगाजीला कांहीं भेट दिल्याशिवाय उपाय नाहीं. ' पण पैसे आणायचे कुठून! तोताजवळ एक छदाम नव्हता.

किसनचंद नांवाचा मारवाडी त्या खेडेगांवात सावकारी करीत असे. नाईलाज म्हणून तोतानें २ रु. शेकडा व्याजावर कर्ज काढलें. त्या गांवचा पटवारी मधुकर कुलकर्णी म्हणून ब्राम्हण होता. फार लोभी व हलकट. त्यानेच दरोगाशीं संधान बांधून हा घाट घातला होता. एकंदर तोतानें ३० रुपये द्यावे. २०दरोगाचे व १० मधुकर कुलकर्णींचे.

मागच्या दरवाजानें ३० रुपये कर्जाऊ घेऊन तोता दरोगासमोर येऊन उभा राहिला, आणि रुपये देणार तोंच धनी तूटून पडली. रुपये हिसकावून घेऊन ती म्हणाली––' वारे तुझी इज्जत? घरांत खायला दाणा नाहीं. आणि मारे रुपये कर्जाऊ घेऊन दुसऱ्याला दान करावयास चालला! १०० रुपयाची गाय गेली ती गेली आणि वर ३० रुपये दक्षिणा? कांहीं लाज, शरम––

धनीयाचें तें उग्र रूप पाहातांच सारेच थक्क झाले. क्षणभर तोता तर बावरून गेला. पण दुसऱ्याच क्षणाला तिच्या अंगावर धांवून गेला. मधेंच झुमरूनें पकडून धरलें. आणि जरबेंत म्हटलें.

'हां दादा, आईला हात लावला तर जीव देईन––झुमरूला दूर सारुन धनी समोर येऊन उभी राहीली आणि म्हणाली–– 'हो तूं दूर बेटा! पाहूं याची बहादुरकी! स्वतःला मर्द समजतो तर. एखाद्या मर्दाशीं लढ म्हणावं! तूं समजत असशील तूं माझं पालन-पोषण करतो, कपडलत्ता देतो, खाऊ पिऊं घालतो––ठेव आजपासून तुझं तुजजवळ। तुझी एक छदामहि आम्हांला नको! आम्ही मिळवूं आणि खाऊं, तेंहि तुझ्यापेक्षां उत्कृष्ट, पहात रहा ––

बिचारा तोता, मर्द असून अबलेसमोर हार मानून चूप राहिला.

## ३

हिरा जो पळाला, त्याचा पत्ताच लागला नाहीं. तोतानें होईल. तितकी धांवाधांव केली. अखेर थकून तो स्वस्थ बसला. त्या दिव-शींच्या नवराबायकोच्या भांडणापासून ते एकमेकाशीं बोलेनासे झाले. घरांत असूनहि तोता पाव्हणा झाला होता.

असेच कांही दिवस गेले. एके दिवशी तोता थंडीतापानें आजारी पडला. साऱ्या गांवांत साथ सुरू झाली होती. ताप आला तोहि जोरदार. तोता एक महिना खाटेवर पडून राहिला होता.

ह्या महिन्यांत धनीनें त्याची शुश्रूषा केली. पति जर मरणोन्मुख असेल तर पत्नीचं कार्य त्याची सेवा करणं होय! वैर करणं नव्हे. तो कितीहि वाईट असला तरी त्याच्या समवेत सारी जिंदगी काढावयाची असते! मग त्याची उपेक्षा करण्यांत काय फायदा! धनीच्या काळजीनें तोता बरा झाला. तेव्हां आपण तिच्यावर हात उगारला याचा त्याला पश्चाताप झाला. त्यानं तिची क्षमा मागितली. आणि दोघांतला वैरभाव नाहींसा झाला.

माघ महिना सुरू झाला. मुसळधार पाऊस वर्षत होता. सगळीकडे पिकें उभीं होतीं. हिराच्या बायकोचं नांव होतं शेवंती. मोठी भांडखोर व हट्टी. हिरा नाहींसा झाल्यापासून तोताच्या साह्यानेंच ती शेतीवाडी करीत होती.

एके दिवशीं रात्रीं तोता शेताची राखण करण्याकरतां म्हणून शेतांतच झोपला होता. तेव्हां रात्रीं धनी त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. तिला पाहतांच घाबरून तोता म्हणाला.

'अरे, इतक्या रात्रीं, आणि मुसळधार पावसांतून कशाला आलीस धनी? कांहीं कमीजास्त?—'

त्याच्या खाटेवर बसत ती म्हणाली 'कांहीं विचारूं नकोस! झुमरूनें तोंडाला काळोखी फांसली!

'काय झालं काय? कोणाला मारलं बिरलं तर नाहीं ना?'

'अ अहं? त्याहिपेक्षां जास्त! त्या गोदूला दिवस आहेत. पांच महिन्यांचें पोट आहे. ती दरवाजांत धरणं धरून बसली. आतां काय करावं? तोता समजून गेला. भोलाच्या इथं सुमन वारंवार

कां जात असे, ते त्याला कळलं. घाबरून तो म्हणाला ‘झुमरु कुठं आहे—’

कांहीं पत्ता नाहीं. कुठं तरी पळून गेला असावा—

थोडा वेळ तोता चूप बसला. म्हणाला ‘तूं कशाला तिला घरांत घेतलंस. काय करूं? सगळं सांगून बघितलं, पण ऐकतच नाहीं धरणंच धरून बसली. म्हणती हें काळं तोंड घेऊन जाऊं कुठं? घरीं भावाला कळलं तर ते मारून टाकतील—

‘ठीक? चल तर—

ते दोघे घराकडे निघाले तेव्हां त्याचा हात धरून धनी म्हणाली ‘आरडाओरडा नाहीं करावयाचा बरं कां? नाहीं तर सारं गांव जागं होईल. आणि गोष्ट षट्कर्णीं होईल—’

तोता म्हणाला- ‘तें मी कांही जाणत नाहीं. लाथ मारून घरांतून हांकलून देतों तिला. आली कशाला मरायला? कां नाहीं गेली झुमरु बरोबर पळून? माझ्या मुलाला तिनंच बिघडवलं. मारमारून हांकलून देतों.’

धनी म्हणाला ‘ झालं, होऊन गेलं! आतां का उगाच राग करतां. कोणामुळें का होईना, इज्जत तर गेलीच. मग त्या बिचारीला मारण्यांत काय अर्थ आहे

दरवाजावर पोंहचल्यावर धनीनं त्याच्या गळ्यांत हात टाकून म्हटलं ‘माझी शपथ आहे तुम्हांला, तिच्यावर हात उचलायचा नाहीं. ती तर शरमेनें अगोदरच मेली बिचारी. आपलंच नशीब खोटं, त्याला ती काय करणार?’

धनीयाचं तें मातृहृदय पाहून तोताच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले. किती प्रेमळ आहे धनी! २५ वर्षांपूर्वी तिच्या जीवनांत प्रवेश केला होता, तेव्हांची धनीया त्याला आठवली. ज्या प्रेमांत

तिनं त्या वेळेस त्याच्या गळयाला मिठी मारली, तेंच प्रेम आजहि तिच्या हातून ओसंडून वहात होतं! त्या प्रेमांत, सारे कलंक सारी इज्जत, बुडून गेली, आणि त्याच्याहि हृदयांत वात्सल्य उफाळून उठलं.

ते घरांत शिरले. तोताला पाहतांच, थरथर कांपत गोदू त्याच्या पायांवर पडली, आणि रडत म्हणाली 'दादा, आतां तुमच्या शिवाय मला दुसरा त्राता नाहीं. पाहिजे तर मारा, पाहिजे तर कापून टाका, पण घरांतून हांकलूं नका!—'

तोतानें वाकून तिच्या पाठीवरून स्नेहार्द्रतेनें हात फिरवीत म्हटलें 'भिऊं नकोस गोदू! हें घर तुझें आहे. आम्हीं तुझे आहोंत; जशी तूं भोलाची मुलगी आहेस तशीच माझी बेटी. तूं काळजी करूं नकोस खुशाल इंथ रहा!

त्याच्या स्नेहभऱ्याशद्बानं तिला धीर आला. अधिकच पायाला चिकटून ती म्हणाली 'दादा, आतां तुम्हींच माझे आईबाप आहांत मला आश्रय द्या? नाहीं तर माझे भाऊ आणि काका मला जिवंत खाऊन टाकतील!—'

धनीला अंतःकरणातला आवेग आवरला नाहीं. ती म्हणाली 'तूं नको काळजी करूंस गोदू! बघूं तूझे काका भाऊ तुला काय करतात ते. मी आहेना——'

गोदूनें आश्चर्यानें धनियाकडे बघितलें. ती घरीं आली तेव्हां त्याच धनियानें रागारागानें तिला वाटेल तें वाक्ताडन केलं होत! झाडू मारून तिला घरांतून हांकलून देणार होती! तीच आतां मातृ-वात्सल्यानं तिचं सांत्वन करीत होती. धीर देत होती.

गोदूनें तोताचे पाय सोडून दिले, आणि धनीच्या गळयाला मिठी



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मारली. धनीनें तिचे अश्रु पुसले. आणि तिचं सांत्वन करावयास सुरवात केली.

गोदूला घेऊन धनी आंत स्वयंपाकघरांत गेली आणि—

तिथंच बसून तोता विचार करीत होता. एकुलताएक मुलगा गेला कुठं?

## ४

या असाधारण अधर्म गोष्टीबद्दल जो क्षोभ व्हावयाचा तो झालाच. तोतानें पापिष्ट गोदूला आश्रय दिला म्हणून त्याला ज्ञाती बाहेर टाकण्यांत आलं. त्याच्या इंथ कोणी पाणी पीईना. भोलाचा व तोताचा दोस्ताना तुटून गेला. तो गाय मागूं लागला. नाहीं तर नगदी पैसे. पैसे नाहीं दिले तर फिर्याद करावयाचाहि दम भरला.

या गोष्टीचं गोदूला भारी वाईट वाटलं. आपल्यामुळें ह्या कुटुंबाला जो त्रास होतो तो बघून तिचं हृदय फाटून जाई. बिचारी घरांतून बाहेरहि पडत नसे.

गावांतले शिष्ट बुद्रुक तोताला फुकटचा उपदेश करीत. तोतानें गोदूला आश्रय दिला हें फार कुकर्म केलं. त्यानं तिला ताबडतोब घरांतून हांकलून द्यावं! पण तोता माने ना. तो म्हणे मी केलं हेंच पुण्य कर्म!

गावांत पंचायत बसली. पंचायतींत तोताला कांहीं तरा प्रायश्चित्त देऊन पुनः जातींत घ्यावं असा घाट जमूं लागला. ताता प्रायश्चित्त घ्यावयास तयार होता पण धनी ऐकेना, ती म्हणे आपण असं कोणतं पाप केलं कीं त्याकरतां प्रायश्चित्त घ्यावं? ह्या गोष्टीवर नवरा-

बायकोची खूप झकाझकी झाली. अखेर तोतानें आपला हट्ट पुरा केला. पंचायतीला ८० रुपये देऊन तो कलंक धूवून टाकला !

त्याच वेळेस गोदूचे दिवस भरून तिला मुलगा झाला. मुलगा झाल्याचें कळतांच दोघांनाहि आनंद झाला. तोतानें विचारलें.

' बाळ कोणासारखा आहे ? '

' अगदीं झुमरूसारखा ! बापावरच पडला बेटा.—'

' अंगानं घष्ट–पुष्ट तर आहे '

' हां ! चांगला गुटगुटीत आहे.

हिंदुस्थानचा किसान हा एक दैववादी प्राणी आहे. त्याचं सारं जीवन सृष्टीच्या लहरीवर अवलंबून. चांगलं पिकपाणी आलं तर कुठं जेमतेम १० महिने आपलं व आपल्या कुटुंबाचं पोट भरतात, नापिकी झाली तर उपासमार आहेच. म्हणूनच अतिशय दरिद्री. इतका दरिद्री किसान साऱ्या जगावर सांपडायचा नाहीं.

त्या वर्षीं तोताचा सारा ऊंस जळून गेला. कांहींसुद्धां पिकलं नाहीं शेतींत. शेतीच पिकली नाहीं तर खाणार कुठून! वैशाख जेमतेम निभावला. पण ज्येष्ठ लागतांच घरांत ज्वारीचा एक दाणाहि शिल्लक उरला नव्हता. घरांत पांच माणसं होतीं पोट भरणारीं. त्यांना दोन वेळांचं जेवण नाहीं मिळालं तर हरकत नाहीं पण एक वेळ तर पोट भरतां आलं पाहिजे ना? उपासाचा महिमा कितीहि मोठा असला, तरी दररोज उपास करून कसं निभावणार ? शिवाय मोलमजुरी करावयाची म्हटलं तरी पोट तर भरलेलं हवंच ! अनाशापोटीं अंगमेहेनत होणं शक्य नाहीं.

उधार तर कोणीच देईना. कारण ह्या तीन सालांत तोतानें प्रत्येकाचं कर्ज करून ठेवलं होतं. आणि त्या कर्जांत मुद्दल तर जाऊं

का. २८६



त्याचे पण एक पै व्याजहि दिलं नव्हतं ? त्यामुळें अशा बुडित असामीला कोण देणार उधार ?

सांज झाली होती. लहानमूल रडत होतं. आईला जिथं शक्तिवर्धक खुराक नाहीं तिथं बाळाला पाजण्याइतकं दूध कसं येणार ? सोना समंजस होती, पण रूपा अल्लड, लहान होती. भाकरीचा हट्ट धरुन ती सारखी रडूं लागली, तोता डोक्याला हात लाऊन विषण्ण चित्तांत बसला होता.

तितक्यांत शेवंती विस्तव नेण्याकरतां आली. स्वयंपाक घरांत पाहते तर अंधार, शेवंतीची व धनीची बोलाचाल सुरू झाली होती. एकेकाळीं शेवंती धनीचा द्वेश करीत होती. पण तिचा नवरा व झुमरु पळून गेल्यापासून तिच्यांत परिवर्तन झालं होतं, आणि ती धनीशीं जितक्या प्रेमानं वागत होती तितक्याच आदरानें तोताचा हुकूम पाळीत आली होती. तोताच्या मदतीनं ती स्वतःच शेत लागवड करीत होती. त्या वर्षीं तिला चांगलं पिक आलं होतं. हिरा होता तोंपर्यंत इतकं तिचं शेत पिकलं नव्हतं. ही सर्व तोताच्या हातगुणाची करामत असं ती समजत आली होती.

थबकून ती म्हणाली जाऊबाई आज चूल थंड कां ? भाकरी बनवायची वेळ तर केव्हांच झाली—'

धनिया म्हणाली—' कसली करूं भाकरी ! घरांत एक दाणाहि नाहीं. स्वतःच्या मुलांबाळांला खाऊं घालावयाऐवजीं जातीची भरपाई केली त्यांनी ८० रुपये देऊन ! आतां मरेनात का मुलंबाळं ! शेवंती म्हणाली ' माझ्याघरून कां नाहीं मागवलं जाऊबाई ? अहो तेंहि तर तुमचंच घर ना ? चलती असते तेव्हां घ्यावं मांडून. पण दुःखाचे दिवस सहानुभूतीनेंच काढले पाहिजेत. थांबा मी देतें आणून ज्वारी—'

थोड्याच वेळांत, डाळ, ज्वारी घेऊन ती परत आली आणि स्वयंपाकाला लागली.

आषाढ लागला. साधारणतः आषाढांतच पाऊस सुरू होतो. शेतकरी त्याच दिवसांत लागण करतात. पण त्या वर्षी पाऊस झालाच नाहीं. अवर्षणामुळें सारे किसान हवालदील झाले. आणि घाबरून गेले. नदीनाले, सुकून गेले. चोऱ्या होऊं लागल्या, डाके पडूं लागले. श्रावणामध्यें पाऊस आला. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. किसान खुषींत आले. माघ निघून गेला आणि भोलाला त्याचे रुपये मिळाले नाहीं, तेव्हां रागारागानं तो तोताच्या घरीं आला. म्हणाला ' काढ माझे रुपये ! तूं वायदा केला होतास कीं ऊंस पेरून झाल्यावर तुझे रुपये देतों म्हणून ; आतां उसाची पेरणी होऊन गेली. ठेव इथं रुपये—'

तोतानें आपल्या विपत्तीचं रडगाणं त्याला सुनावलं. पण तो ऐकेना. अखेर निराश होऊन तो म्हणाला ' नाहीं विश्वास पटत तर घरांत जाऊन पाहा. एक दाणा तरी शिल्लक आहे का ? उधार कोणी देत नाहीं. कोठून आणून तुझे पैसे ?—'

' मी तें कांहीं जाणत नाहीं, माझे रुपये ठेव —'

' मजजवळ नाहींत. तुला हवें तें कर—'

' असं का ? मग तुझे दोन्ही बैल घेऊन जातों मी. '

आश्चर्यानं तोतानं त्याच्याकडे बघितलें. बैल म्हणजे शेतकऱ्यांचे दोन हात. तेच तोडूं पाहतो का हा ? भिकारी का करून सोडावयाचा विचार आहे याचा ?

दीन स्वरांत तो म्हणाला—माझे तेव्हढेच बैल आहेत, ते नेले तर माझा सर्व नाश होईल.

' मी काय करूं ? तुझं काय होईल तें तूं पाहा ! '

' तुझा धर्म जर हाच असेल तर घेऊन जा !—'

गोदू आडून हें सर्व ऐकत होती. धनी शेतांत गेली होती. तिला निरोप दिला तावडतोब ये. धनीला सारं कळतांच ती बाहेर आली आणि चिडून म्हणाली ' देऊन देना बैल ' तो मागतो आहे ना ! घेऊन जा म्हणावं ! आम्हीं मजुरी करूं पण तुझ्यासारख्यासमोर हात पसरणार नाहीं. '

भोलानेंहि संधी साधली. ज्या कामाकरतां तो आला होता, त्याला हीच संधी योग्य आहे असं पाहून मानभावीपणानें तो म्हणाला— तुम्हीं २०० रु. गेले तर ऊर बडऊन घेतां, पण माझी लाख मोलाची अब्रु गेली त्याचं काय ? हे बघा तुम्हांला बैल हवे असतील तर मी सांगतों तें करा. गोदूला तुम्हीं जसं घरांत घेतलं तस बाहेर हांकलून द्या. तिनं आमचं नाक कापलं, त्याचं प्रायश्चित्त तिला मिळालंच पाहिजे. तिला भीक मागत हिंडू दे—'

थोडंस हंसून धनी कठोर स्वरांत म्हणाली—

' अशी गोष्ट कालत्रयीं होणार नाहीं ! गोदू माझी आहे. आणि तिला मी या जन्मींच काय पण लाख जन्मांतसुद्धां बाहेरचा दरवाजा दाखविणार नाहीं. हां तिनं पाप केलं, ना कोण म्हणते ! पण राहत्या म्हातारवयांत तुम्हाला लग्नाची खुमखुमी आहे, मग ती तर अजून तरुण आहे—

तोतानें तिच्या म्हणण्याची री ओढली. तेव्हां नाइलाजानें भोलानें बैल सोडले, आणि निघाला.

ताच गोदू मुलाला कडेवर घेऊन त्याच्या समोर येऊन उभी राहिली आणि म्हणाली—काका, मीं करते तुमचं म्हणणं मान्य. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें भीक मागून माझं व मुलाचं पोट भरीन. नाहीं

तर तलावांत जीव देऊन टाकीन. पण त्यांच्या बैलाला हात लावूं नका—

भोला म्हणाला 'चल दूर हो डाकीणी ! तुझ्याकरतां तलावच योग्य आहे. जा जीव देऊन टाक. कोणी तुझ्याकरितां रडणार नाहीं.

खालीं मान घालून बिचारी दोन पावलें गेली असेल नसेल तोंच धनी धांवतच आली, आणि तिला पकडून म्हणाली, 'कुठं जातेस सूनबाई ? हें घर तुझं आहे, जीवंतपणीं आणि मेल्यावरसुद्धां ! मरूं दे तुझ्या बापाला. त्याला म्हणावं जो आपल्या मुलाला असं सांगतो त्यानंच जीव द्यावा तलावांत. मवाली कुठचा ! जा बाबा बैल घेऊन वाटलं तर पी रक्त त्यांचं—

तिनं गोदूला ओढत घरांत नेलं, आणि भोला बैल घेऊन निघाला.—

कानून असा आहे कीं, शेतकऱ्याचे बैल अशा तऱ्हेनें ओढून नेतां येत नाहींत. कोणी असे ओढून नेले तर तो गुन्हा होतो. भोलानें रागारागांत बैल तर सोडून नेले. पण गांवच्या चार महाजनांनीं आणि पोलीस-पाटील-पटवारी यांनीं त्याला हटकलं तेव्हां तो घाबरून गेला. आपण गुन्हा केला हें त्याच्या लक्षांत येऊन त्याला दरदरून घाम सुटला—

त्याला वाचविलं तोतानें ! भोलाला पटवारीनें अडविलं हें कळतांच तो धांवतच आला आणि घडलेली हकीकत सांगून म्हणाला.

—' हे म्हणाले गोदूला हांकलून दे, नाहीं तर बैल नेतों. मी सांगितलें गोदूला हांकलणार नाहीं. तुझा धर्म जर हेंच सांगत असेल तर घेऊन जा बैल.

दातादीन म्हणाला—' हां ! धर्माचाच प्रश्न उभा राहिल्यावर कोणी काय बोलावं ' जा बाबा घेऊन बल—

# ५

कार्तिक महिना सुरू झाला. किसान आपलीं शेतें नांगरण्यांत गढून गेले. फक्त तोता डोक्याला हात लावून तसाच घरीं बसून राहिला. तो शेत कशावर नांगरणार? बैल तर नव्हते. बैल म्हणजे किसानांचे प्राण. ते प्राणच निघून गेले होते. पण घरांत दाणा आला पाहिजे ना? बसून कसं चालेल. एके काळचा हा शेतकरी आज मजूर बनून काम करूं लागला. आणि कसं तरी पोटाला मिळवूं लागला.

एकुलता एक मुलगा सोडून गेला, कुठं गेला तेंहि कळलं नाहीं. सुखरूप आहे का विपत्तींत आहे, भगवान् जाणे! मुलगा म्हणजे जीविताचा आधार! तोच ह्या वयांत पळून गेला, तेव्हां म्हाताऱ्याला मरेतों काम करण्याव्यतिरिक्त गत्यंतर नव्हतं! बिचारा थकेतों काम करीत होता.

तोताच्या हलाखीचा फायदा घ्यावयाचं दातादीननें ठरविलं. अडचणींत सांपडलेल्या माणसाला कोणीहि लुटतं? गरजवंताला अक्कल नसते म्हणतात! दातादीननें तोताला असाच गळींत गांठला आणि करार करून घेतला; दातादीननें बैल द्यावे, बीं, बियाणं द्यावं, आणि त्याबद्दल तोतानें त्याला पिकांतला अर्धा हिस्सा द्यावा.

तोताच्या जिवावर आलं. पण करतो काय झाला कबूल.

ऊंस लावला. भरगच्च आला. त्या उभ्या पिकाकडे पाहून तोताला आराम वाटला. पण त्याचबरोबर भितीही वाटली. त्याला फार कर्ज होतं. ऊंस कापाई सुरू व्हावयाचाच उशीर, सारे सावकार हजर

होतील, आणि सर्व पैसे घेऊन जातील ! मेहनत तो करणार. माल मलिदा सावकार खाणार ! पुनः उपास व मजुरी आहेच.

त्या जिल्ह्यांत एक साखरेचा कारखाना निघाला होता. कारखानदार ऊंस विकत घेऊं लागला. शेतकरी भराभर ऊंस विकूं लागले. तोतानेंहि आपला ऊंस विकून टाकला. कपाई सुरू झाली. धनी, सोना, रूपा, गोदू सर्व शेतांत खपूं लागले. तोंच एकेक सावकर हजर होऊं लागला. प्रत्येकाला वाटेला लावतांना तोता थकून गेला. ऊंस गिरणींत नेऊन मोजून द्यावयाचा व तिथंच तोल झाल्यावर पैसे घ्यावयाचे ठरलें होतें. सर्व किसान एके दिवशीं गाड्या भरून घेऊन गेले.

पण रुपये घेऊन बाहेर येतांच दरवाजावर सावकारांचा जथ्था हजर होताच. त्यांतल्यात्यांत महमंद पठाणानें अगोदरच पैसे चारून व्यवस्था करून ठेवली होती. किसान बाहेर येतांच त्यानें प्रथम अडविलें. जाड लाठी आदळीत तो शिवी हांसडून म्हणाला चलो साले, दो, निकालो पैसे !

तोताला १२० रुपये मिळाले होते महमंद पठाणानें व्याजासहित १०० रुपये वसूल करून घेतले.

तो दूसरा सावकार हजर. मारवाड्याकडून कर्ज काढलं होतं.

तो झाडाखालीं बसलाच होता. पठाणासमोर जीव भीत होता. म्हणून त्याचा नंबर दुसरा लागला. पठाणाचा तो अगडबंब देह व तो सोटा नसता तर काय बहार झाली असती ? ते सर्व रुपये आपण खोटा हिशेब करून हडपच केले असते ! पण काय करावं ?

तो तोतावर तुटून पडला. होते नव्हते ते रुपये छिनून घेतले. खालीं माना घालून ते सर्व किसान रिक्त हस्तानें घरीं गेले. त्या गावांतल्या एकाहि शेतकऱ्याजवळ रक्ताचं पाणी करून पिकविलेल्या उसाच्या

मोलाची एक छदामहि उरली नव्हती. धनीनं घरांत आल्यावर विचारलें—

किती रुपये आले ?—

१२० आले होते पण ते सर्व सावकारांनीं लुटले. अधेला सुद्धां वांचला नाहीं.—

उदास स्वरांत धनी म्हणाली ' ईश्वराची इच्छा ! चला मजदूर बनूं यां !—

फाल्गुन आला. पुन्हां उसाची पेरणी सुरू झाली. धनी, सोना, रूपा, गोदू व तोता स्वतः च्या शेतांत लागवड करूं लागले. पण ते धनी म्हणून नव्हे तर मजूर म्हणून ! तो आतां किसान नव्हता. मजूर होता ! दातादीन त्याचा ' भागीन ' नव्हता. मालक होता. दातादीन मोठा कडक मालक होता, त्याच्या इथं कोणीच मजूर टिकत नसे. त्यानें तोताला दम दिला ' झरझर हात चालव तोता. अशानें कसं चालेल ?—

तोता म्हणाला ' करून तर राहिलों पंडीतजी. '

' हां ! तें ठिक आहे. पण जरा जलदी—'

तितक्यांत धनी, सोना, उसाचे गठ्ठे घेऊन भिजलेल्या साडीनें व चिखलानें भरलेल्या हजर झाल्या. गठ्ठा टाकून त्यानीं दम घेतला तोंच दातादीन ओरडला— ' अरे थांवलां काय ! चला. कामें चालूं द्यात '

धनी म्हणाली ' थोडा विसावा तर घेऊं द्या पंडीतजी ! '

दातादीन गरम होऊन म्हणाला ' मजूरी देतों कामाची. विश्रांतीची नाहीं धनी. विश्रांती घ्यावयाची तर घरीं, इथं नाहीं—'

धनी बिघडली. आणि तिखट उत्तर देणार तोंच तोता म्हणाला ' कां जात नाहीं कामावर ? उगाच हुज्जत कशाला घालतेस ? ' धनीला सोना ओढून घेऊन गेली. आणि म्हणाली.

‘ आई, जरा आपला ‘ वखत ’ तर पाहत जा ! प्रत्येक गोष्टीवर कशाला लढाई करतेस ?—’

थोड्या वेळानं धनी गड्डा घेऊन परत आली. पाहते तों तोता बेशुद्ध होऊन पडला होता. आणि लोक गोळा झाले होते. तिनं गड्डा फेकून दिला आणि धांवत जाऊन तोताचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें, आणि आक्रोश करूं लागली.

दातादीन धांवत आला, ‘ अरे कोणीतरी पाणी आणा. जा पळा ’ दोन चार आसामी पाणी आणण्याकरतां पळाले. तितक्यांत सोना पाणी घेऊन आली, दातादीननें त्याच्या तोंडावर पाणी मारीत धनीला म्हटलं—‘ रात्रीं यानं जेवण केलं होतं ? ’ धनी म्हणाली ‘ जी हां ! पण काय सांगूं पंडीतजी, महिनाभर झाला पोट भरून रोटी तर मिळतच नाही. काम तर करावं लागतं, विश्रांती कशी मिळणार गरीबाला.—’

थंड पाण्याच्या शिडकाव्यामुळें तोता शुद्धीवर आला. दोनतीन माणसांच्या साह्यानें त्याला घरीं चारपायीवर निजविण्यांत आलें.

तितक्यांत रूपा दौडत आली. ‘ भाऊ आला, भाऊ आला—’

झुमरु, एका मजुराच्या डोक्यावर हारा देऊन आला, आणि आईबापांच्या पायां पडला.

## ६

झुमरु गोदूला आश्वासन देऊन निघाला होता तेव्हां कांहीं काळ ते बरोबर चालले होते पण घर जसजसें जवळ येऊं लागलें तसतसा झुमरु गोदूच्या मागें मागें राहीला होता. त्याचे पाय थरथरत होते.

गावांत आपल्या पापाची जहिरात होतांच सारं गांव आपली छी थू करील आणि आई तर झाडू मारून हांकलून देईल हें मनांत येऊन तो फार घाबरून गेला होता. त्या मुळें गोदू घरांत शिरली होती तेव्हां झूमरु अंधारांत दडून बसला होता. घरांत जायची त्याची हिम्मत झाली नव्हती.

घरानजीक आल्यावर तो म्हणाला होता तूं जा आंत गोदू.

घाबरून गोदू म्हणाली होती एकटीच ? नाहीं ! नाहीं ! ! माझ्या जिवाला डर लागते. तुमची आई फार जहाल आहे. झाडू घेऊन मारायला लागली तर मी करूं काय ?——

झुमरु म्हणालं होता—— आई जहाल तर खरीच ! रागांत चार दोन शिव्याहि देईल. क्षणभर मारायलाहि धांवेल पण तिचा राग ओसरून गेल्यावर तिच्या इतकी मातृवत्सल व प्रेमळ बाई सांपडायची नाहीं. तूं घाबरूं नकोस गोदू, तूं हो पुढें मी आलोंच थोड्या वेळानं——

गोदू घरांत शिरल्यावर झुमरु क्षणभर संभ्रमांत पडला आणि तसाच लपून राहिला. मग त्यानं दाराच्या फटींतून बघितलं होतं. गोदू आईला मिठी मारून रडत होती आणि आई तिचं सांत्वन करीत होती. तें दृश्य बघून त्याचे नेत्र आर्द्र झाले होते. गोदुची काळजी मिटली होती

तो विचारकरीतच उभा राहिला होता

त्यानं विचार केला होता, अशा कलंकित स्थितींत घरीं जाणं योग्य नाहीं. कुठं तरी शहरांत पळून जावं, चार दोन पैसे कमवावे, व मग श्रीमंत होऊन दोनतीन वर्षांनी परत यावं ! तो श्रीमंत झाल्यावर कोणाची मदार आहे त्याला नांवें ठेवायची ?——

बस ! तो पळून जाणारच !

तो निघाला आणि नजीकच्या शहरांत गेला. प्रथम त्यानं ४।६ आण्यावर मजुरी केली. कांहीं दिवस १५ रु, यांवर नोकरी केली. थोडेसे पैसे गांठी झाल्यावर स्वतंत्र धंदा सुरू केला. हळूहळू आपला जम बसविला. थोडीशी सावकारीहि केली. रुपयाला १ आणा प्रमाणें कर्जाऊ रकम पैसे दिले. आणि अशा तऱ्हेनें हळूहळू माया सांचविली. २।३ वर्षं असेच निघून गेले. ज्या करतां तो घरांतून पळून आला होता, तें अशा तऱ्हेनें साध्य झाल्यावर त्याचं मन घराकडे ओढ घेऊं लागलं. एके दिवशीं तो बाजारांत गेला, आई, बाप, बंहिणी व बायको, यांना नानातऱ्हेचे जिन्नस, व कापड खरेदी करून तो निघाला.

जेव्हां तो घरीं पोंचला तेव्हांच ऊन लागून तोता अजारी पडला होता. आईच्या मिठींतून मुक्त झाल्यावर तो म्हणाला 'दादाला काय झालं, आई?—

घरांतली हलाखीची परिस्थिती सांगून त्याला दुःखी करणं धनीच्या जीवावर आलं. ती म्हणाली 'ऊं! कांही विशेष नाहीं, जरा डोकं दुखतंय—पण बेटा होतास कुठं लांब इतके दिवस!

शरम वाटून तो म्हणाला ' कुठं लांब नव्हतों गेलों आई. नजीक तर होतों खामगांवला—'

' इतक्या जवळ असून एक चिठ्ठीसुद्धां पाठविली नाहीस आं?—'

घरांतील सर्व मंडळींना झुमरूच्या आगमनाचा अपार आनंद झाला होता. पण गोदू मात्र चिडून उठली होती. तिची जी फसवणूक त्यानं केली होती, त्याचा ती आज बदला घेणार होती. जनांच्या तोंडीं तिला एकटीला सोडून तो पळून गेला होता. त्याचा सूड तिला उगवावयाचा होता. कर्म करतांना शरम वाटली नव्हती, पण

५१ ३० ८१४० 卐
का. ८८५२
ना. के. महाजन
किसान

सो कलंक धारण करावयाची मात्र त्याला शरम वाटली होती ! ठीक तर, याचा जाब आज विचारणार होती ती--

सोना, रूपा निरनिराळे खेळ, साडी पाहून खूष झाल्या होत्या. त्यानं गोदूला आरसा–फणी आणली होती तद्वत् मुलांकरतां 'आंगडं-टोपडं 'हि आणलं होतं. रूपा तें घेऊन गोदूला म्हणाली ' वहिनी-बघ तर खरं राजाला काय आणलं तें ! ' पण गोदू घुश्शांत होती, तिरसटपणानें ती म्हणालीं ' नको त्याला तें ! दे फेकून—'

गोदूला भेटायची व तिची क्षमा मागावयाची त्याची फार इच्छा होती. जो अपराध त्यानं केला होता, त्याचं क्षालन करण्यांकरतां त्याच्या जीवाची तगमग चालली होती. पण गोदू त्याला मुद्दाम टाळीत होती. तो आंत आला तर ती बाहेर जाई. तो बाहेर आला कीं ती चुलीजवळ जाऊन बसे. का ९३३/८८५२

मुली खुष होत्या. मुलगा घरीं आला व तोहि सुखरूप याचाच आईवडिलांना आनंद होत होता ! मुलगा चांगला घट्टपुष्ट झाला, समजदार झाला, याचा गर्व तोताच्या अंतःकरणांत मावत नव्हता.

इकडे राजाला पकडून सोना त्याला अंगरखा, टोपी, बूट विजार, चढवीत होती. तिकडे आंतमध्यें गोदू व झुमरूमध्यें खडाजंगी सुरू होती—

रोषानं गोदू म्हणाली ' वा राव ! बरेच दिवसांनी आमची आठवण झाली म्हणायची ? किती कपटी आहांत तुम्हीं ? मागून येतों म्हणून म्हणालांत आणि पळून गेलांत ? कांही लाज, शरम होती कीं नाहीं ?—

झुमरूनें जें कांहीं झालं तें सांगून क्षमा मागून म्हटल.

गोदु मी भिऊन पळून गेलीं जरूर, पण तुला एक क्षणहि

विसरलों नव्हतों. तुझी प्रतारणा करायची नव्हती मला. आतां तुला नेण्याकरतांच आलों मी इथं !—

थोड्याच वेळांत गोदूचा उसना रागरोष निघून गेला व दोघांची दिलजमाई झाली. गोदूनें घरांतील परिस्थिति सांगितली. पंचायतीचा दंड व त्यामुळें झालेले हाल त्याला सांगितले. झुमरूचं गरम रक्त उसळून उठलं. तो उठून म्हणाला.

इतका अन्यायी ! आतांच विचारतों याचा जाब. तो जाऊं लागला, तेव्हां गोदूने त्याला पकडून म्हटलें.

एवढी घाई कशाची ! सारा दिवस पडला आहे ह्या गोष्टी करायला. खा, प्या, विश्रांती घ्या नी मग करीत बसा हे उद्योग—

सायंकाळच्या सुमारास झुमरू आपली जोडी परत आणण्याकरतां भोलाकडे जाणार होता. जोडी परत आणल्याशिवाय त्याला झोंप येणार नव्हती. तो निघाला तेव्हां तोता म्हणाला

'भांडू बिंडुं नकोस बेटा' त्यानं आपली जोडी नेली त्यांत त्याची काय कसूर ? पैसे तर निघत होते ना आपल्याकडे ?—

झुमरु म्हणाला—' दादा ह्या बाबतींत तुम्ही बोलूं नका ! त्याची गाय होती ५० रुपयांची, आणि आपली जोडी १५० रुपयांची आहे ? आपल्या पैशाकरतां पाहिजे तर त्यानं दावा करावा फिर्याद करावी, पण जबरदस्तीनें जोडी नेणें हा कुठला न्याय ? माझ्यासमोर जोडीला हात लावला असता, तर तिघांचाहि इथंच मुडदा पाडला असता. पण तुम्ही पडले सांबाचे अवतार—

धनी मधेंच म्हणाली 'अरे ; पंचायतीशीं व जातीशीं भांडून कसं चालेल बाबा ! मुलीचा विवाह तर करायचा—
जातीशीं फटकून कसें चालेल ?—'

झुमरु म्हणाला 'हे सर्व खोटं आहे आई ! पूर्वी आपला रोटी

बेटी व्यवहार होता, तेव्हां नाहीं झालं तर माझं लग्न ? कां नाहीं कोणी मुलगी दिली ह्या घरीं ? आपण गरीब आहोंत म्हणूनच ना ? दुनिया पैसेवाल्यांची आहे, आई ! त्यांचा नाहीं हुक्कापाणी कोणी बंद करीत ?—

मुलगा रडूं लागला म्हणून धनीया घरांत गेली, आणि आपला दंडा उचलून तो जाऊं लागला तेव्हां पुन: तोता म्हणाली

मी येऊं तुझ्याबरोबर ?—'

'नाही दादा ! तुम्हीं आल्यानं सर्व मसलत बिघडून जाईल—

आणि तो घराबाहेर पडला.

थोड्या वेळानं मुलाला घेऊन धनी परत बाहेर आली. पाहते तों झूमरु निघून गेलेला—

'हें काय ? झुमरु एकटाच गेला कीं काय ?

अहो तुम्हाला अक्कल कधीं येणार ? भोला जोडी सहजासहजीं देणार होय ? ते तिथे बापलेक तुटून पडतील ना त्याच्यावर ? जा जा पळा त्याला धरून आणा, हात जोडले तुमच्यापुढें !

तोता उठला, दंडा घेतला आणि धांवतच त्यांच्या मागोमाग गेला—

इकडे झुमरूला भोलाचा मोठा मुलगा गणू भेटला. त्यानं आपल्या ऐश्वर्याचें खूप वर्णन ऐकवलं. तें एकतांच गणू गार झाला, त्याच्याबद्दल गणूला आदर वाटला. केवढा मोठा मनुष्य झाला हा झुमरु !

ते भोलाच्या घरीं आले तेव्हां भोला सुतळी कातीत बसला होता. झुमरु भोलाच्या पायां पडला. व म्हणाला—

क्षमा करा काका ! माझ्या हातून अक्षम्य गुन्हा झाला. भोला म्हणाला—'झाला खरा ! तुझी तर गर्दन काटायला पाहिजे त्या

गुन्हयाबद्दल. जाऊं दे तें; तूं आपणहून घरीं आलास तेव्हां माफ करतों तुला सर्व. कसं काय तुझं! असतोस कुठं!

...झुमरूनें तिखटमीठ लावून आपल्या भाग्याचा वृत्तांत म्हाताऱ्याला सांगितला इतकेच नाहीं तर गणूला नोकरी मिळवून देण्याचं आश्वासनहि दिलं. गणू घरामध्यें भारी उपद्रव करीत असे तो अनायसें निघून जाईल हें ऐकून म्हातारा खूष झाला.

थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. झुमरूचा सिधा स्वभाव व ऐट पाहून संकोचानं म्हातारा म्हणाला, 'रागारागांत मनुष्य अंध होऊन जातो बेटा! मी तुझी जोडीं घेऊन आलों ही चूक झाली माझी. घेऊन जा तूझी जोडी वापस!'

साळसूदपणानं झुमरु म्हणाला, 'नको काका असूंदे तुमचकडे! मी दुसरी जोडी ठरवून सुद्धां टाकली.'

....'नाहीं. नाहीं मान हालवून भोला म्हणाला तुझी जोडी घेऊन जा झुमरु!—'

'तुमचें देणें पाठवून देतों काका!—'

नकोरे रुपये, बाहेर थोडेच आहे, कांहीं झालं तरीं तूं माझा जांवई. जाती करतां भ्यावं लागतं म्हणून, नाहींतर तुझ्या माझ्यामधें कसलं वैर आहे बेटा! खरं म्हटलं तर गोदू चांगल्या घरीं आरामांत आहे म्हणून मी आनंद मानावयास पाहिजे होता, पण तें न करतां तिचा द्वेषच करीत आलों मी!

जोडी घेऊन तो घरीं आला तेव्हां संध्याकाळ होऊन गेली होती.

## ७

प्रेमामध्यें बिघाड केव्हां नी कसा होईल हें सांगतांच येत नसतं. अथांग तुडुंब भरलेलं हृदय दुसऱ्याच दिवशीं रीतं होतं आणि मग भांडणाला सुरवात होते. असं कां होतं, कोणालाच सांगतां येत नाहीं !

काल रात्रीं जोडी घरी आणून बांधणारा झुमरु दुसरे दिवशीं घराला कंटाळून जातो, आणि क्षुल्लक कारणावरून आई वडीलाशीं भांडतो याला दैव नाहीं म्हणायाचं तर काय म्हणायाचं ! त्याचं असं ——होळीचा दिवस त्या दिवशीं होता तो. होळी म्हणजे खेडूतांचा मजा करावयचा दिवस. त्या दिवशीं भांग गांजा बेवडा जुवा वैगरे निशिद्ध गोष्टींला धर्मानें मुभा दिलेली असते. झुमरु बऱ्याच दिवसांनी घरीं परत आला होता. शिवाय त्याच्या खिशांत पैसे खुळखुळत होते. शहरची हवा खाल्लेला असल्यामुळें त्यानें तमाशांत नकलेचा कार्यक्रम ठरवून टाकला. त्या नकलांमध्यें गांवच्या चार शिष्ट बुद्रुकांच्या नकला केल्या गेल्या. ज्या माणसांच्या नकला केल्या गेल्या त्यांमध्यें पटवारी कुलकर्णी व इतर सावकारहि होते. त्यांची हुबेहुब नकल केल्यामुळें ते तोतावर व झुमरूवर गरम झाले होते. याचा सूड पटवारी कुलकर्णीने घेतला. तोतानें कुलकर्णी कडून ७० रुपये कर्जाऊ घेतले होते आणि ते व्याजासुद्धां परतहि केले होते. पण कुलकर्णीला सूड उगवायाचा असल्यामुळें त्यानें पैशाची मागणी केली. बिचारा भोळा तोता. त्याने पावतीसुद्धां घेतली नव्हती. सर्व पैसे भरूनहि अखेर त्याच्यावर बाकी निघतच होती.कुलकर्णी ऐकेना.दम देऊं

लागला. त्यावरून बापलेकांचा पहिला खटका उडाला. झुमरूचें म्हणणें की व्याज मुद्दल दिलें असतांना वडिलांनी पावती कां घेतली नाहीं, असा कसा यांचा स्वभाव! तोता म्हणाला बरामणावर विश्वास ठेवला त्याचं हें फळ! नशीब आपलं पण ते ७० रुपये झुमरूला भरावे लागले त्यामळें त्याच्या जीवाचा तिळपापड झाला.

दुपारीं शेतामधें काम चालूं होतं. तोतानें मोट धरली होती, आणि सोना, रुपा व झुमरु उसाला पाणी देत होते. कांहीं कारणावरून बहिणी बहिणींत बाचाबाची झाली. रूपा सोनाला चावून बसली. सोनानें रूपाला जोरानें ढकलून दिलें. पडल्यामुळें ती रडूं लागली. व रूपा चावल्यामुळें हाताची आग होत होती म्हणून सोना रडूं लागली.

त्यांच्या रडण्यांमुळें झुमरु चिडला. त्यानें प्रत्येकीला दोन थपडा ठेवून दिल्या. भाऊनें मारल्यामुळें रडतच त्या घरीं निघून गेल्या. आणि उसाला पाणी देण्याचं काम तसंच राहून गेलं!

तोता म्हणाला 'आतां दांड कोण सोडील? जा त्यांना बोलावून घेऊन ये.'

'तुम्हीं लाड करून, बिघडवून टाकलं त्यांना.'

'अरे, असं मारल्यानं अधिक निर्लज्ज होतील कीं!'

'मग रोटी बंद करून टाका! आतां ठिकाणावर येतील--'

'मी त्यांचा बाप आहें, कसाई नाहीं बेटा.'

झालं! पुनः पितापुत्रांमधें खटका उडाला. झुमरु रागानें घरीं गेला व गोदूला घेऊन आला.

त्याच रात्रीं त्यानें खामगांवला जायचा निश्चय केला. बस! आतां इथं राह्यचं नाहीं! घरांत आपल्याला कोणी विचारीत नाहीं. मग रहा कां? घेण्यादेण्यांत आपलं कोणी ऐकत नाहीं. थोडसं मुलीला मारलं

तर उलट आपल्यालाच दाट बसतो. जणूं काय मी म्हणजे कोणी परकीच आहें ! मग ह्या धर्मशाळेंत राहूं कशाला ?––

त्याचा निश्चय ऐकून धनिया म्हणाली ' आज का जाणार आहेस तूं ? थांब ना चार पांच दिवस ! उसाची ' बोइणी ' करून जा–'

' नाहीं आई ! माझी तीन रुपये रोजाची कमाई बुडते ! इथं चार आणे रोजहि मिळत नाहीं. शिवाय गोदूला घेऊन जाणार आहें मी. जेवणाचे भारी हाल होतात—'

' घेऊन जा बाबा ! पण ती तिथं एकटी कशी घर सांभाळणार ? आप्तइष्ट तर कोणींच नाहींत––'

' उं ' पैसा असला कीं सारे जमतात ! रिकामा खिसा असला म्हणजे सख्खे आईबापसुद्धां विचारत नाहींत–'

तो फटकारा धनीला झोंबला. पायापासून डोळ्यापर्यंत झणझण्या उठल्या. ती म्हणाली ' छान ! आईबापांची हीच का किंमत ?– पैशाच्या तोलानं आईबाप मोजतोस होय !–' तूं आमचं थोडंसं कर्ज फेडलं तर इतकी घमेंड ? आणि कर्ज तरी आम्ही कोणाकरतां काढलं बेटा ? तुमचं पालन–पोषण करण्याकरतां, कां आमच्या सुख-विलासाकरतां ?––'

' मला काय माहित, कशाला काढलं तें ! मला तर एक पैसाहि मिळाला नाहीं––'

' पालनपोषण केल्याशिवायच इतका मोठा झालास होय ?–'

' पालन करायला तुम्हांला काय खर्च आला ? बच्चा होतों, दूध पिलवलं ! माझ्याकरतां कधीं दूध नाहीं, तूप नाहीं. कांहीं आलं नाहीं. जें तुम्हीं खाल्लं ते मी खाल्लं ! आणि आतां तुम्हांला वाटतं

तुमचं सारं कर्ज मी फेडूं. तुमच्या मुलीचे विवाह मी करूं, शेती-वाडी बी, बियाणं मी देऊं. जणूं काय माझी सारी कमाई तुमच्या करतांच आहे. माझेहि बाल–बच्चे आहेत कीं नाहीं ?—'

एकाच क्षणांत तिच्या जीवनांतलं मृदु स्वप्न तुटून गेलं. आतां-पर्यंत तिला वाटत आलं होतं, कीं तिचे हाल, तिचं दारिद्र्य सारं दूर झालं. तिचा मुलगा मोठा झाला होता, आणि तिचा प्रतिपाळ करणार होता ! पण ते झुमरूचे शब्द तिच्या हृदयाचा दाह करून निघून गेले. तिचं स्वप्न मुलांवरील तिचा विश्वास व साऱ्या आशा जळून खाक झाल्या. ज्या जीवननौकेवर स्वार होऊन हा जीवनसागर ती पार करूं इछित होती तीच तुटून गेली. आतां बुडून मरण्या-व्यतिरिक्त काय उरलं होतं !

दुसऱ्याच क्षणाला तिचं मातृहृदय उचंबळून आलं, तिला वाटलं, 'नाहीं माझा मुलगा असा नाहीं. तो इतका दुष्ट नाहीं, इतका नीच नाहीं, आईबापांचं हृदय तोडून टाकण्याइतका निर्दय नाहीं; त्याला कोणी-तरी कानमंत्र दिला असला पाहिजे! आणि गोदूशिवाय हा उद्योग कोण करणार ?'

धनियाची खात्री झाल्यावर, तें तिनं बोलून दाखविलं. त्याचा परिणाम असा झाला कीं घरांत एकदम भांडणाचा डोंब उसळला. धनिया व गोदू कडाक्यानें भांडूं लागल्या. झुमरु मधून मधून आग फैलावीत होता.

आणि खालीं मान घालून तोता बाहेर ओटीवर बसून निमूट ऐकत होता.

गावचे लोक तमाशा पाहाला गोळा झाले. तेव्हां असह्य होऊन तोता आंत गेला आणि हात जोडून म्हणाला—

‘ तुझ्या पाया पडतों धनी पण आतां चूप राहा. ज्या वेळेस कत सर्वतें पोर घरांत राहू इच्छित नसतात तेव्हां नाइलाज असतो. आपलं कर्तव्य आपण केलं. त्यांना जाऊं दे जिथं जायचंय तिथं. कुठहि. सुखांत असले म्हणजे झालं! आपलं काय! हत्ती गेला शेपूट राहिलं. जसे दुःखांत हे दिवस गेले तसेच उरलेले जातील—’

झुमरूनें जायची तयारी केली. आंता ह्या घरांत पाणीसुद्धां प्यायला नाहीं आणि आई असं बघते तिचं तोंडहि पहावयाचं नाहीं असं त्यानं ठरविलं!

ते सर्व तयार झाले. राजाला कपडे घालून गोदूहि तयार झाली. तोता म्हणाला बेटा जातोस जा. कोणाच्या तोंडानें तुला नाहीं म्हणूं? पण एक ऐक जिनं तुझं पालन केलं, आपलं रक्त देऊन तुला वाढवलं तिच्या एकदां तर पाया पड!

झूमरु तिरस्कारानं म्हणाला नाहीं! मी तिचें तोंडहि पाहूं इच्छित नाहीं—’

तोताच्या नेत्रांत अश्रु आले. म्हणाला जशी तुझी इच्छा! सुखांत राहा—’

गोदूनें जातांना सासूच्या पायावर मस्तक ठेवलें. तिनें आशीर्वादसुद्धां उच्चारला नाहीं.

झुमरु राजाला खांद्यावर घेऊन पुढें, बिस्तारा बगलेत घेऊन मागे गोदु, आणि गांवची पोंहोंचवावयास आलेली मंडळी बरोबर अशा लवाजम्यांत ते गांवच्या बाहेर निघून गेले.

आणि तशीच बसून धनिया स्फुंदुन स्फुंदुन रडत होती!

## ८

झुमरु, आणि गोदू गेल्यापासून तोताच्या घरांत स्मशानशांतता पसरली. धनियां नेहमी दुःखांत गढून गेलेली असे. राजाची याद येऊन तिचा जीव कासाविस होई. राजा गोदूचा मुलगा खरा, पण त्याचं लालनपालन धनियानें केलें होतें. ती त्याला नेहमी खाऊं घालीं, न्हाऊं घाली, काजळ घाली, आणि जेव्हां जेव्हां तिला कामातून वेळ मिळे तेव्हां तेव्हां त्याचा लाड करीत असे. त्याचा मृदु, कोमल चेहरा पाहून तिचे सारे क्लेश हरून जात असत. आणि तिचं मातृ-हृदय गर्वानें फुलून जात असे. त्यांची रिकामी खाट पाहून तिला भडभडून येई, आणि राहून राहून वाटे, तिनं असं काय पाप केलं होतं, कीं त्यामुळें तिला एवढी मोठी शिक्षा मिळाली? गोदूबरोबर तिनं कधीं वाईट ' बर्तान ' केला होता? ज्या दिवशीं ती रांड या घरांत आली त्या दिवसापासून सोन्यासारखा संसार धुळीस मिळाला. पंचायतीनं दंड केला, आणि होतं नव्हतं ते धुवून नेलं! जातीनं हुक्कापाणीं बंद केलं. झुमरूनं कधींसुद्धां तिच्या विरुद्ध ब्र उच्चारला नव्हता, पण तोच आज दुरुत्तरं करून निघून गेला, याला कारण ही रांडच! ज्या वेळेस तिला आश्रय कोणी दिला नसता तो तिनं दिला त्याचं हे फळ काय?

धनी जेव्हां जेव्हां गोदूवर आरोप करूं लागली, तेव्हां एके दिवशीं न राहून तोता म्हणाला. 'अरे'पगलीं, जेव्हां तेव्हां त्या गोदूला कां दोष देतेस? आपला दाम खोटा त्याला ती काय करणार?

[library stamp]


झुमरूनं तिला नेलं नसतं तर काय आपणहून ती गेली असती ? शहरची हवा लागली तुझ्या मुलाला, समजली ?

हळू हळू विनोद सुरू होई. एव्हढाच तिच्या जीवाला विरंगुळा मिळे.

मोठी मुलगी सोना सत्राव्या वर्षांत पदार्पण करीत होती. अशिक्षित खेडूतांत मुलींची लग्नें लवकर होतात ! सोनाचेंसुद्धां एव्हांना लग्न झालें असतें. तोता दोनतीन सालांपासून त्याच फिकिरींत होता पण खिसा रिकामा असल्यामुळें कांहींच इलाज चालत नव्हता. या वर्षी कांहींहि झालं तरी लग्न केलंच पाहिजे होतं मग त्या करतां कर्ज काढावें लागलें तरी हरकत नाहीं, शेतीवाडी विकावी लागली तर फिकिर नाहीं. त्याचं म्हणणं होतं कीं गरीबासारखा खर्च करावा. धनी ऐकेना. ती म्हणे कांहीं झालं तरीं २०० रुपये खर्च होणारच. तोता जेमतेम १०० रुपये जमवूं शकला असता. १०० रुपये झुमरूला मागावे असं त्याच्या मनांत येऊं लागलं.

दोनतीन दिवसांनंतर एके दिवशीं तोतानें झुमरूकडे जाण्याचा विषय काढला.

पण धनी झुमरूचे कठोर शब्द विसरली नव्हती. झुमरूकडून एक छदामहि तिला नको होता. कोणत्या हालतीत नाहीं.

तोता म्हणाला—मग करणार तरी काय !

मान हालवून धनी म्हणाली समजा झूमरु परदेशांत नसता गेला मग तुम्हीं जें केलं असतं तेंच करा आंता !

तोता चूप बसला. त्याच्या जवळ उत्तरच नव्हतं. एक मिनिटा-नंतर तो म्हणाला मी तुला विचारतोंय कसं करावं तें !

धनी म्हणाली हा विचार करावा पुरुषांनी ! स्त्रियांनी नाहीं. अशा तऱ्हेनें कित्येक दिवस तसेच विचार करण्यांत निघून गेले. काय करावं याचा उलगडा कांहीं तोताला झाला नाहीं.

दुलारी नांवाची स्त्री किराण्याचं दुकान चालवीत होती. तोतानें तिच्या दुकानावरून किती तरी रुपयांचा माल उधार घेतला होता. मधून ती सावकारीहि करीत असे. तोताकडे प्रत्यकाचें येणे असल्या मुळें गांवात त्याची पत मुळींच नव्हती. त्याला वाटलें कोणी पैसे कर्जाऊ हेईल तर ती दुलारी. तो दुलारीच्या दुकनावर गेला आणि निराश स्वरांत तिला घरची हाल सांगून कर्जाऊ रकम मागूं लागला.

दुलारी देईना. ती म्हणाली 'पूर्वी नेलेल्या रकमेवर व्याजसुद्धां दिलं नाहींस, आणि पैसे मागतो ? ––'

'काय करूं. दुलारी, इलाजच नाहीं. मुलीचा विवाह तर केला पाहिजेना, तूं रक्कम दिली तरच तरुणोपाय आहे.–

'अरे मजजवळ एक रुपयाबी नाहीं. जो नेतो परतच करीत नाहीं. काय करणार सांग ?—'

'झूट बोलतेस दुलारी, असं कधीं झालंय––'

दुलारी म्हणाली 'झुमरूकडे कां नाहीं जात ? ख्याली खुशालीहि कळेल, पैसेहि मिळतील—

निराश स्वरांत तोता म्हणाला 'कांहीं देणार नाही तो! मुलं एकदां कमावतीं झालीं म्हणजे त्यांची नीती फिरून गेलेली असते. माझी तर तयारी होती दुलारी. पण धनी ऐकत नाहीं. आणि तूं तर जाणतेसच कीं तिच्या मर्जीविरुद्ध वागला तर घराचे दरवाजेच बंद होतील म्हणून !

थोडावेळ स्तब्ध बसून दुलारी म्हणाली 'ठीक आहे. जा तूं लग्नाची तयारी कर, मी देतें दोनशें रुपये. पण लिहून दिलंस पाहिजे हो —'

मोठ्या खूषींत तोता निघून गेला.

× × ×

असा विवाह सोनाला मान्य नव्हता. दाराआड उभी राहून तिनं सारं कांहीं ऐकलं होतं! दादा दुलारी कडून २०० रुपये कर्जाऊ घेणार हें ऐकून तिच्या हृदयांत आग पेटली होती. तिला घरांतली परिस्थिती माहित होती. अगोदरच कर्जाचं पाणी डोक्यावरून फिरलं होतं. त्यांत पुन: दोनशेंची भर. इतकं कर्ज दादा कशाच्या आधारानं फेडणार? दोन तीन वर्षांत २०० चे ४०० होतील. पुन: रूपाच्या लग्नांत कर्ज आहेच. एकूण काय कीं जी शेतीवाडी उरली ती ही लिलाव होऊन जाईल; आणि मग दारोदार भीक मागावी लागेल. तें लग्न तिला नको होतं! त्यापेक्षां मरून गेलेलें काय वाईट?

विचार करून तिनं एक मार्ग काढला. तिचं नियोजित स्थळ होतें गांवापासून तीन मैल अंतरावर असलेल्या सोनारी गांवात. शेतीमध्यें एक नदीच आडवी होती. भावी पतिलाच तिनं निरोप पाठविला कीं अशा परिस्तिथींत तुम्ही हुंडा घेऊं नये. नाहीं तर लग्नच अशक्य होईल. तिची मैत्रिण हा निरोप घेऊन गेली.

दगा तिच्या नवऱ्याचं नांव. त्याच्या बापाचें नांव होतं गुंजारराव. प्रथम दगा घाबरून गेला होता. वडिलांचा खाष्ट स्वभाव तो जाणून होता. वडील ऐकतील अशीं खात्री नव्हती. पण जेव्हां त्याला कळलं कीं त्यानं असं नाहीं केलं तर सोयरिक मोडून जाईल तेव्हां हिम्मत धरून तो वडिलांकडे गेला. बोलाचालीवरून गोष्ट वाढत गेली. अखेर गुंजाररावानें दगाला बडवून काढलं.

पुन: निराश होऊन सोना विचारांत पडली. २।३ दिवसांनंतर गुंजाररावाकडून एक मनुष्य पत्र घेऊन आला. पत्रांत लिहिलं होतं—

स. न. वि. वि. कांहीं दिवसापूर्वी लग्नाच्या बाबतींत असं ठरलं होतं कीं हुंडा देण्यांत यावा. आतां शांतपणें विचार करताच असं दिसून आलं कीं, असा हुंडा घेणं–देणं दोघां मुलां–मुलींना मान्य नाहीं. त्यामुळें दोघांहि घरांत अशांती माजेल. तुमचा आमचा संबंध जुडला आहे, त्याला विघातक होईल असं कांहीही आपण करतां कामा नये. म्हणून तुझ्या कडून हुंडा, करणी, मानमरातब कांहीं नको. हां! तुम्ही स्वखुषीनं जें द्याल त्याचा नम्रपणें स्वीकार केला जाईल—

पत्र वांचतांच तोताला भारी हर्ष झाला. धांवतच घरांत गेला आणि पत्र दाखवून तो म्हणाला 'देवाची कृपा––'

धनिया कांहीं क्षण विचारांत पडली. मग तीक्ष्ण स्वरांत म्हणाली, '––हा त्याचा मोठेपणा आहे. पण आपलीहि इज्जत कांहीं आहेच ना! लोक शेण घालतील ना आपल्या तोंडांत. तें कांहीं नाहीं मुलीचा विवाह आपल्या इतमामाला शोभेल असाच झाला पाहिजे. चला मी सांगतें त्यांना कीं, तुम्हांला सर्व कांहीं स्वीकारावंच लागेल–'

तोता चुपचाप बाहेर गेला आणि चिलीम पीत बसला. देवाच्या कृपेनें कर्जांत अडकलेला त्याचा गळा सुटत होता. पण नाहीं! धनीया ऐकेल तर कीं नाहीं, जेव्हां पाहावं तेव्हां विरुद्धच जाते. घराची दशा बघूनहि तिचे डोळे उघडत नाहींत, काय म्हणावयाला आतां?

## ९

मधुकर कुलकर्णी म्हणजे त्या गांवचा पटवारी. पटवाऱ्यांना उणें असलेले सर्व गूण कुलकर्ण्यांजवळ होते. गांवच्या कल्याणाची सारी जोखीमदारी आपल्या शिरावर आहे असा त्याचा प्रामाणिक समज

झाला होता ! त्यामुळें कोणी कोणाची इंचभर जमीन बळजबरीनं हस्तगत केली तर तें त्यांना सहन होत नव्हतं ! तद्वत कोणी आसामी सावकारांची पै रक्कम बुडवूं लागलं तर तेंहि त्याला मान्य नव्हतं ! त्याच प्रमाणें ' समझोत्या 'वर तर त्याचा मुळींच विश्वास नव्हता ! भांडण—तंट्यावर त्याचं फार प्रेम. दिवसभरांतून लावालावी भांडण-तंटा उपस्थित केल्याशिवाय तो रात्रीं पाणी तोंडांत घालीत नसे !

मागरू नांवाचा एक सर्वांत धनिक होता. साधारणतः गांवच्या एका टोकाला त्याचं घर होतं. पूर्वीं तो सावकारी करीत असे. पण मूल-बाळ कोणीच नसल्यामुळें त्यानें ही दगदग बंद केली होती. एक छोटंसं शिवमंदिर बांधून तो नेहमी आध्यात्म जीवनांत मग्न असे. तोताकडे त्याची बरीच रक्कम होती. पण ती त्यानं कधीं मागितली नाहीं किंवा तोतानेंहि कधीं आणून दिली नाहीं. त्या दोघांनाहि देण्याघेण्याची चिन्ताच नव्हती. एकदां दोनदां त्यानें रक्कम मागितली होती, पण तोताची अन्नान्नदशा बघून तो चूप बसला होता.

कुलकर्ण्यांचं जाणं येणं मागरूकडे वाढलं होतं. दिवसांतून दोन-तीन तास तरी ' बातचीत ' केल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे. बसल्या बसल्या त्यानं कलागत लावून दिली. त्यावर्षीं तोताचं पीक सर्वांत चांगलं आलं होतं. तें त्याच्या डोळ्यांत सलूं लागलं होतं. त्यानं मागरूला बिनमोल सल्ला दिला कीं एकदम वसूल करावयाची हीच वेळ आहे. ह्या वेळेस जर तोतावर फिर्याद केली तर व्याजा-सुद्धां रक्कम वसूल. पण मागरू दयाळूंपेक्षां आळशी जास्त होता. त्याला कोर्टकचेरीची दगदग सहन होत नव्हती. पण जेव्हां कुलकर्ण्यांनी त्याला आश्वासन दिलं कीं कोर्ट कचेरींत न जातां तें सर्व कांहीं करून देईन तेव्हां मागरूं साहेबानं दावा लावायचं कबूल केलं इतकेंच नव्हे तर खर्चाचे पैसेहि त्याला देऊन दिले.

तोताला ह्या भानगडी बिलकूल माहीत नव्हत्या. दावा केव्हां लावला फैसला केव्हां झाला त्याला कांहींच माहित नव्हतं पण जेव्हां त्याच्या शेतांतल्या धान्याचा लिलाव करण्याकरीतां बेलीफ आले तेव्हां तो मटकन खालींच बसला. सारा गांव त्याच्या शेतावर जमा झाला. तो उठला. धांवतच मागरूंकडे गेला आणि धनी कुलकर्ण्यांच्या १० पिढ्यांचा उद्धार करण्यांत गुंतली होती. पण मागरूं साहेब पूजेअर्चेमधे गुंतले असल्यामुळें तोता तसाच परत आला. उसाचा लिलाव झाला १५० रूपयांचा. मागरूंच्याच माणसांनीं ऊंस मोल घेतला.

ऊंस गेला, सारी मेहनत गेली, वर्षाची भाकरीहि गेली पण त्याच बरोबर झुमरूचं एक संकट उभं राहिलं. दूलारीनं उभ्या पिकावर रक्कम द्यावयाचं कबूल केलं होतं. पीक हातचं गेलं आणि दुलारीनं रक्कम द्यायचं नाकारलं. त्यानं तिच्या खूप विनवण्या केल्या. तरी दुलारीनं मानलं नाहीं. दया आणि धंद्यात, ती शिकली नव्हती. नाईलाज तोता कपाळाला हात लावून घरीं गेला.

नवरा बायकोंत सल्लामसलत सुरूं झाली. लग्नतिथि जवळ आली होती. घरांत दाणाही नव्हता, अब्रू जायची पाळी आलीं करावं काय ?

नवरा बायकोचा विचारविनमय चालू असतांना सुंदरी हजर झाली. सुंदरी भोलाची दुसरी बायको. इतक्या अवधींत भोलानें लग्न केलें होते. सुंदरी मोठी रंगेल होती. नुकताच तिचा नवरा मरण पावला होता. त्यानंतर बरोबर १५० व्या दिवशींच तिनं पुनार्विवाह केला होता. घरांत शिरल्याबरोबर सासूसुनेचं भांडण सूरू झालं. एके दिवशीं भांडण विकोपास गेलं. भोलाच्या वडील मुलाचं नांव होतं कामता. भोलाची बायको मरण पावल्यापासून त्याचींच स्त्री घर धनीन झाली होती. आंता सासू आल्यामुळें तिचा अख्त्यार गेला

होता. कामता बायकोच्या आज्ञेत वागणारा होता. त्यामुळें एके दिवशीं वडिलांना मारठोक करून रात्रींच कामतानें त्याला घरा बाहेर काढलं होतं.—

आशा तऱ्हेनें हाकलून दिल्यामुळें भोला मोलमजुरी करूं लागला. त्या गांवचा पोलीस पाटील रामराव होता. त्यानं सुंदरीच्या यौवनावर व सौंदर्यावर खुष होऊन भोलाला ३ रु. महिन्याप्रमाणें नोकरीला ठेवलं होतं. भोला बिचारा मजूर होता, पण सुंदरी राणी बनली होती. म्हातारवयांत लग्न केलं म्हणजे जे हाल होतात, ते भोलाचे होऊं लागले होते. पोलीसपाटलाचा जोर असल्यामुळें सुंदरी बेफाम बनली होती. शिवाय तिचे व पोलीसपाटलाचे संबंध गांवभर माहीत असल्यामुळें तिच्या छेडीस जाण्याची कोणाचीच हिम्मत होईना. यामुळें, तिच्या बेफाम तोंडामुळें सारे गांव तिला भिऊन असे—

सुंदरीला तोताची हालत कळली होती. त्याला रकमेची जरूर आहे हेंहि ती जाणून होती. बोलतां बोलतां तिनं हळूच विचारलं— ‘ लग्नाची तयारी झाली असेलच ! देण्याघेण्याचं सामान बघूं तर द्या ?—’

तोता म्हणाला ‘ कुठलं सामान ? पैशाची भारी तंगी आहे. आणूं कुठून ?

सुंदरीनं डाव टाकला. सारे लोक तिला नांवे ठेवित होतीं. तिनं विचार केला, ह्या अडलेल्या माणसाचं काम आपण करून दिलं तर सारं गांव आपल्याला ‘ देवी ’ म्हणेल ? आणि अशा तऱ्हेनें सारं गांव जें आपल्या विरुद्ध आहे, आपलं गणगान गाऊं लागेल——

स्वतःची इज्रत वाढविण्याकरीतां सुंदरीनं तोताला रुपये उसने द्यायचें कबूल केलें.

तोता अडला होता. तिने दिलेले रुपये त्यानें चूपचाप घेतले.

# १०

झुमरु शहरांत आला, तेव्हां त्याला कळलं कीं, ज्या ठिकाणी तो पाटी घेऊन बसत असे तिथें दुसराच पाटीवाला बसूं लागला. त्याचें गिऱ्हाइक त्याला विसरूनसुद्धां गेलें होतें. घरसुद्धां त्याला चांगलं मिळालं नव्हतं. एक लहानशी खोली अंधारी दुर्गंधयुक्त. या खोलींत गोदू व राजा मोठ्या मेटाकुटीनं राहात होते. राजाला मनसोक्त खेळायची संवय होती. पण इंथ उड्या मारायला जागाच नव्हती मुळीं. त्यामुळें त्याची भारी कुचंबणा झाली; आणि तो आईला एक मिनीटहि सोडायला तयार नव्हता. गोदूसुद्धां कंटाळून गेली होती. इंथ तिला एकटीलाच काम करावं लागे. शिवाय बोला-चाली करावयास दुसरं कोणीच नाहीं. नेहमीच एकाकी राहावं लागे.

त्यांतच झुमरूचा त्रास. झुमरु मस्त ज्वानींत होता. त्याच्या साऱ्या लालसा अतृप्तच राहिल्या होत्या. त्या पुऱ्या करावयाचा त्यानें चंग बांधला होता. त्यांतच तिला दिवस गेले होते. डोकं दुखूं लागलें. अन्नावरची वासना उडाली. शरीर सुकून गेलं. आणि सारखं पडून राहावंस वाटूं लागलं! कमजोरीमुळें अंगावर अगदीच कमी दूध होतं. राजा दोन वर्षांचा होऊनहि प्यायचा हट्ट धरुन बसे. आणि जबरदस्तीनें पिऊं लागे. स्तनांतून दूध नाहीं आलं म्हणजे चीडून असा चावा घेई कीं गोदूचे प्राण डोळ्यांत येत.

पाहतां पाहतां पावसाळा लागला. राजाला हगवण लागली. आणि तो मरण पावला.

राजाच्या मरणाचं तिला भारी दुखः झालं. राजाची याद यऊन

रात्रंदिवस तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. तिचं कशांतच मन लागेना.

झुमरूनें धंदा बंद केला व साखरेच्या कारखान्यांत नोकरी धरली. नोकरी बरोबर एक व्यसनहि लावून घेतलं. सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत काम करून सारेच कामकरी थकून जात. थकवा घालण्याकरतां सर्वच एकजात दारू पीत. झुमरु तें करूं लागला. दररोज पेला पिऊन नशेमध्यें तो घरीं येई. कांहीं तरी कारण काढून गोदूला शिव्या देई, आणि झोडपून काढे.

या परिस्थितीमुळं गोदु दबकून गेली होती. तिला आतां राहून राहून वाटत होतं, आपण रखेली असल्यामुळें, असं जीवन आपल्या वाटेला आलं! लग्न झालं असतं तर मदार आहे त्याची असं नचि वर्तन करायची? घर गेलं,अब्रू गेली आणि हे असहनीय जीवन वाटेला आलं. जो माणूस याला कारणीभूत होता त्याचा ती तिरस्कार करूं लागली. तिनं त्याच्या खाण्यापिण्याची पर्वा केली नाहीं. जेव्हां तो तिच्यावर हात उगारी तेव्हां तेव्हां तिच्या अंगांचा तिळपापड होई आणि तिला वाटे कीं याचा खून करून टाकावा.—

दिवसभरत येऊं लागले तसतशी तिची काळजी वाढतच गेली. कोण आहे ह्या घरांत आपलं बांळतपण करायला? कोण आपला संभाळ करणार? झुमरु असाच मारत राहिला तर मरण कांहीं टळत नाहीं!

एके दिवशीं ती नळावर पाणी भरायला गेली. तेव्हां शेजाऱ्यानीं तिला विचारलं—'कितवा महिना आहेग तुला?—'

लाजत गोदू म्हणाली काय जणं! मी कांहीं मोजले नाहींत.—'

तिला विचारणारी, देहानं काळी कुळकुळीत होती. कुरूप नकटी

व मोठ्या मोठ्या स्तनांची बाई होती. नांव होतं येडूबाई, तिचं लाकडाचं दुकान होतं, तिचा पति मजुरी करीत होता.

येडू म्हणाली ' मला तर वाटतं ग, कीं महिने भरत आले. दाईबाई पाहून ठेवलीस का नाहीं ?—

घाबरून गोदु म्हणाली ' माझं तर इथं कोणीच ओळखीचं नाहीं.'

' तुझा मर्द काय करतोय, झोप लागली का त्याला,—

' त्यांना माझी काय फिकर,

' हं! दररोज पाहते तर खरं!—— '

त्याच रात्रीं तिचं पोट दुखूं लागलं. कशीबशी खिचडी करून ती तिथंच आडवी झाली. रात्रीं १० वाजतां ताडी पिउन झुमरु घरीं आला. चारदोन शिव्या हांसडून कसाबसा जेवला आणि तिला न उठवतांच झोपी गेला. पहाटे पहाटे त्याला थंडी वाजूं लागली म्हणून जागा झाला, पाहातो तों गोदु जोरजोरानें कण्हत होती.

नशा उतरली होती. म्हणाला—' कां ग काय होतं——'

' पोट दुखतय——

' अग दिवसा कां नाहीं सांगितलं? आतां ह्या अंधारांत जाऊं कुठं ?—

' माझ्या मरण्या जीण्याची तुम्हाला काय कदर ?—'

झुमरु घाबरून गेला. रात्रीं जाऊं कुठं आणि पैसे? घरांत एक कवडीहि नव्हती. सर्वच दारूमध्यें खर्च झाली होती. तितक्यांत बाहेरून कोणी-तरी हांक मारून म्हटलं—

' कांहो घरधनीण तर कण्हत नाहीं ना? पोट दुखतं काय?—'

गोदूचें कण्हणें ऐकून तीच सकाळची बाई विचारपूस करावयास आली होती.

या दुनियेंत, कोण कुठून आणि कशी मदत करील याचा नेम

नसतो. येसू नी गोदूची ओळख नसतांना, त्या अडीअडचणीच्या प्रसंगीं रात्रंदिवस तिनं मदत केली; आपणहून धावत आली. विशालहृदय म्हणतात तें हें !

गोदूची स्थिति पाहून ती त्या अंधाऱ्या रात्रीं एकटीच दाईच्या शोधांत बाहेर पडली. दाई सांपडली खरी. पण ती इतका दाम मागत होती कीं तो देणं जवळ जवळ अशक्य होतं.—

नाइलाज येडू म्हणाली 'तूं बाहेर जा झुमरु! मी घेतें सर्व पाहून. उगीच नाहीं बारामुलांची आई झाली तीं!—'

ती गोदूजवळ बसली आणि तिला धीर देऊं लागली. दु:खाच्या असहनीय त्रासामुळें परिस्थितीची जाणीव होऊन गोदु निराश झाली होती. येडूचा हात पकडून म्हणाली—'मी नाहीं वांचणार ह्या त्रासांतून जीजी ! माझं असं कांहीं झालं तर मुलाचा सारा भार तूं संभाळ. ईश्वर तुझं भलं करो ! आणि ती बेशुद्ध झाली—

सकाळीं ९ वाजतां ती शुद्धीवर आली, तेव्हां येडू मुलाला घेऊन बसली होती, आणि तिला पांढरी साडी नेसवलेली होती. तिला भारी थकवा आला होता, आणि, इतकी कमजोरी वाटत होती कीं जणूं काय देहांत रक्ताचा एक बिंदुसुद्धां नसावा.

त्या नंतर येडू दररोज येत असे. गोदूला खाण्याचं करून देऊन जात असे. पुनः दुपारीं येत असे. आणि मुलाचं सारं कांहीं करून जात असे. चार दिवस गेले पण गोदूच्या अंगावर दुध कांहीं आलें नाहीं. दूध नसल्यामुळें मूल रडून आकांत करूं लागलें. वरचें दूध कांहीं त्याला पचेना. त्यामुळें तो सारखा रडतच असे. केव्हां केव्हां येड आपलें स्तन त्याच्या तोंडात देत असे. एक क्षण बालक उगीराही पण दूध न निघाल्यामुळें पुनः अक्रोश करीत असे. येडू घाबरून गेली. असंच चालू राहिलं तर मुल १०–१२ दिवसांच्यावर

जगणें शक्य नव्हतें. त्याच मोहल्यांत पेनशनर डॉक्टर होता. त्याला ती घेऊन आली. त्यानं तपासून सांगितलं--

'इच्या अंगांत रक्तच नाहीं. दूध येणार कुठून! प्रथम रक्ता करतां टॉनिक घ्यावयास पाहिजे म्हणजे एका महिन्यांनं दूध येईल—' पण तोंपर्यंत ह्या मासाच्या गोळ्याचं काय? बिचारा मरून जाईल! अर्धी रात्र झाली होती. झुमरू ताडी पिऊन बाहेर पसरला होता. येडू मुलाला घेऊन बसली होती. आणि आपल्या छातीला लावीत होती. एकाएकीं तिला वाटलं कीं आपल्या स्तनांत दूध आलं.

गोदूला आश्चर्य वाटलं. लहानमूल पितं असलं तर दूध येतें. पण येडूचा शेवटचा मुलगा ८ वर्षांचा होता. ईश्वराची इच्छा दुसरं काय!

येडू वेळांतवेळ काढून, केव्हां केव्हां काम बाजूला सारून येत असे आणि मुलाला पाजून जात असे. जन्मतःच मुलगा दुर्बल होता पण मस्त येडूचं दूध पिऊं लागतांच चांगला धष्टपुष्ट झाला होता.

गोदूचंन झुमरूचं अजूनहि पटत नव्हतं. एकमेकांबद्दल उत्पन्न झालेली घृणा ओसरली नव्हती. गोदूला वाटे कीं झुमरु एक नंबरचा आपमतलबी प्राणी आहे. त्याच्या लेखीं एक भोग्य वस्तु एव्हढीच आपली किंमत. कदाचित् आपल्या मरण्याचीहि तो वाट पहात असावा. वाटत असेल कीं केव्हां मरते ही, अन मी दुसरी आणतो पण बेटा, तोंड धूवून ये!—

मुलाला घेऊन खेळवावं असं झुमरूला वाटे. पण गोदूच्या भीतीनें तसं त्याला करतां येईना. गोदु त्याच्यापाशीं बोलतसुद्धां नव्हती, किंवा त्याची सेवासुद्धां करीत नव्हती, त्यामुळें त्यांच्यातलं वैमनस्य दृढ होत गेलं होतं, प्रत्येकजण सरळ जबाब उलटाच घेऊं लागला, आणि एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यावयास टपून बसाल.

साखरेवर 'ड्यूटी' लादण्यांत आली. त्याचा फायदा घेऊन मिल मालकांनी पगारांत कपात केली. कपातीला मजूरसंघानें विरोध केला. आणि हरताळ सुरू केला. हरताळ करतांना हजारो मजूर भूके मरतील याचा विचारहि पुढाऱ्यांनी केला नाहीं. त्यांच काय जातं, मरतील ते मजूर ! झुमरु प्रथमपासून बेदरकार स्वभावाचा मनुष्य होता. मरण्याला तो कधीच भीत नसे. स्वभावानुरूप तो सर्व मजुरांचा म्होरक्या झाला .

गोदूला झुमरूची करणी आवडली नाहीं. एके दिवशीं ती म्हणाली तुम्हीं मुलांबाळांचे धनी आहांत, अशा तऱ्हेनें आगींत उडी मारणं तुम्हांला शोभत नाहीं !

झुमरु म्हणाला—'तूं कोण माझ्या बाबतींत बोलणार ? तुझा उपदेश नाहीं मागितला मी ?

झालं ! ठिणगी पडली. अंतःकरणांत दडवून ठेवलेली सुडाची भावना प्रबल झाली. बोलाचाली वाढली, आणि मारामारीपर्यंत पाळी आली. झुमरूनं गोदूला खूप पिटून काढलं.

येडूनें येऊन गोदूची सुटका केली. आणि त्याची निर्भत्सना केली. झुमरु बेफाम बनलेला होताच. गर्जून तो म्हणाला—

तूं कां येतेस माझ्या इथं येडु ? हें घर माझं आहे. खबरदार पुनः ह्या घरांत पाऊल ठेवलंस तर—

किंचित् हसून उपहासयुक्त स्वरांत येडू म्हणाली

कां येतें ? तुमच्या इथं नको येऊं तर खाऊं काय ? इथूनच तर रोटी मिळते मला ! अरे मी जर नसती तर तुझी हि बीबी तुझ्या लाथा खायला आज इथं हजर नसती. आहे ठाऊक !—

,जें मी एकदां सांगितलं ते सांगितलं ' तूं इथं येतां कामा नये—' येडू तशाच निःशंकतेनें म्हणाली 'फार झालं झूमरु ! चूप बैस.

बिचारी गरीब गाय भेटली म्हणून, तुझ्या ह्या गमजा. माझ्या सारखी जर एखादी भेटली असती, तर चपलानं तुझं तोंड रंगवून टाकलं असतं. काय समजलास तूं!—

गल्लींतले लोक जमा झाले, आणि तमाशा पाहूं लागले. प्रत्येक जण झुमरूला 'जामूं' लागला. दररोज बायकोला मारहाण करणारे तेच लोक आज न्याय आणि दयेच्या गोष्टी झुमरूला ऐकवूं लागले होते.

रागारागांतच झुमरु घराबाहेर पडला, आणि कारखान्यांत निघून गेला.

दरम्यान संपानं उग्र रूप धारण केलं. मिलमालकांनं नवीन मजूर आणले. नवीन मजूर किती तरी दिवसांचे बेकार होते. अन्नान्न करीत मरणं काय नी लढाई करून मरणं काय त्यांच्या लेखी एकच! नवीन मजुरांनी कामावर जातां कामा नये नाहींतर आपल्यावर उपाशीं मरावयाची पाळी येईल, हें जाणून जुने मजूर हट्टाला पेटलेले.—

अहिंसाव्रत कांहीं काळ ठीक असतं पण जेव्हां चुरस निर्माण होते तेव्हां त्या व्रताची सांगता दगडाविटांनी, लाठींनी भरून निघते. दोन्ही दलांत भयंकर मारामारी झाली.

पुढारी म्हणवणारे तर केव्हांच पळून जाऊन घरांत दडून बसले होते. मारखाणारे मारखात होते. झुमरु सर्वांत पुढें म्हणून त्यालाच जास्त मार बसला. गरीब मजूर असल्यामुळें अस्पताल मध्यें जागा मिळाली नाहीं. मलमपट्टी बांधून त्याची रवानगी करण्यांत आली.

मारामुळें लोळागोळा झालेला झुमरु खाटेवर पडला होता, आणि त्याच्याकडे बघत, गोदू आपल्या नशिबाला दोष देत होती. त्याच्या हट्टीपणामुळें हा प्रसंग पडला म्हणून तिचं मन चिडून उठत होतं,

तर दुसरीकडे तिच्या अंतःकरणांतली त्याच्याबद्दलची मृदुता जागी होत होती.

तितक्यांत येडूनें आवाज दिला ' गोदू, झुमरूचं कसं आहे ग ? आतां कोणीतरी दुकानावर सांगितलं, तशीच धांवत आलें मी—'

तिला पाहतांच गोदूला भडभडून आलं. ती रडूं लागली.

येडू खाटेजवळ गेली. झुमरूच्या छातीला हात लावला, चेहरा पाहिला, आणि मग धीर देत म्हणाली—' उं ! विशेष नाहीं. होऊन जाईल चार दिवसांत दुरुस्त. कांहीं घाबरायचं कारण नाहीं. तुझं नशीब बलवान् बेटी, म्हणुन हा वांचला. अरे, कित्येक मेले म्हणतात त्या दंग्यांत. घरांत कांही पैसे आहेत ?—'

मान हालवून गोदूनं नकार दिला.

' कांहीं हरकत नाहीं. मी देतें. जरा गरम करून दूध पाज त्याला. गोदूनें तिचे पाय धरले. म्हणाली ' जीजी, तूंच माझी आई आहेस. तुझ्याशिवाय तारणारा कोणीच नाहीं !

बराच वेळ असाच गेला. गोदू खाटेजवळ बसली होती आणि येडू मुलाला खेळवीत होती. त्यावेळेस झुमरूनें डोळे उघडले. गोदूला पाहतांच दीन स्वरांत तो म्हणाला—

'—तुला जो त्रास दिला त्याचं हे फळ आहे गोदू ! जें कांही बोललों असेल, मारठोक केली असेल, त्याबद्दल क्षमा कर ! दो घडीचं जीवन शिल्लक आहे. आतां वाचण्याची आशा नाहीं. दुःखानं सारं आंग कसं ठणकतय !—'

येडू उभी राहून म्हणाली, काय अभद्र बोलतोस ! तूं नाहीं मरणार, माझी खात्री ?'

आशेची रेषा त्याच्यापण मुखावर उमटली. तो म्हणाला ' खरंच नाहीं मरणार मी ?—'

'नाहीं! अरे झालंय काय तुला? कुठं थोडासा मार लागला. तर इतका घाबरला. या जखमांनीं कोणी कधीं मरत नसतो.

'खरंच जीजी! आतां नाहीं मारणार गोदूला–'

हूं 'दुरुस्त झाल्यावर विसरून जाशील.'

'नाहीं जीजी, कधींच विसरणार नाहीं—!

तीनचार दिवसांत झुमरूची अवस्था कठीण होत गेली. तापाच्या ग्लानींतच तो सारखा निपचित पडून राहूं लागला. ते सारे दिवस गोदूनें दिवसरात्र जागून काढले. ती सारखा पहारा देत होती आणि मृत्यूला त्याच्या नजीक येऊं देत नव्हती.

चौथे दिवशीं त्याला एका दवाखान्यांत पोंचविलें, तेव्हां झुमरूला पक्की आशा वाटली.

इकडे गोदू, येडूचे पैसे खर्च करीत होती. त्याची तिला शरम वाटूं लागली. येडु कांहीं घरची श्रीमंत नव्हती. तिच्या इतकीच तीहि शेतावर कमाई करीत होती. आणि ती कमाई गोदूला देत होती. झुमरूला दुरुस्त व्हावयाला चांगला तब्बल महिना लागणार होता. दवापाणी, खाणंपिणं, याला बराच खर्च येणार होता!

कांहीं तरी काम करून तो खर्च भरून काढावयाचें गोदूनें ठरविलें! ती एका गुराख्याची मुलगी होती. लहानपणापासून गवत कापावयाचं शिक्षण तिला मिळालं होतं. तेंच तिनं सुरू केलं.

मुलगा येडूजवळ देऊन सकाळीं ती रानांत जाई व संध्याकाळीं गवत विकून परत येई; आणि रात्रीं झुमरूची सेवा करी. इतके श्रम करूनहि तिचें मन प्रसन्न होतं. तिचं दुबळं शरीर चांगलं धष्टपुष्ट बनत गेलं होतं!

× × ×

जमीनदार आप्पासाहेबाच्या मुलीचं नांव होतं मालती. मालती मोठी दयाळू होती. गरीब किसानांबद्दल तिला नेहमीच सहानुभूति वाटे. एके दिवशीं मालती अशीच एका खेडेगांवात गेली होती. तिथल्या शेतकऱ्यांच्या बायका मुलांत मिसळून ती प्रचारकार्य करीत असे. परत येतांना पेट्रोल संपलं, आणि गांवापासून नजीकच थांबावं लागलं. रात्र झाली होती. आजूबाजूला चिटपाखरूंहि नव्हतं. मोटार-गाडी ढकलत न्यावयास कोणी मजूर दिसेना. कर्मधर्मसंयोगाने त्या बाजूनें झुमरु येत होता. बड्या माणसाची गाडी बघून त्यानं मदत केली.

मालती खूष झाली. म्हणाली नोकरी करशील?—

मिलच्या नोकरीला झुमरु कंटाळला होता. मिलमधे पगार चांगला मिळत असे. मेहनतहि खूप करावी लागत असे. मालतीकडे १५ रुपये पगार ठरला. पण मिलच्या रक्तशोषण करणाऱ्या मजुरी-पेक्षां इथलं माळ्याचं काम त्याला पसंत पडलं. मालतीनें त्याला आपल्याच बंगल्यातल्या आवारांतली नोकराची राहण्याची खोली दिली. गोदूहि त्याच्या बरोबर नव्या घरीं गेली. गोदूचा मुलगा मंगल कोठीसमोर धूळ मातींत खेळत असे. मालती बगिच्यांत आली म्हणजे तिची नजर त्याच्याकडे जाई. एकेदिवशीं मालतीनें त्याला खाऊ दिला. त्यादिवसापासून त्या दोघांची गट्टी जमली. मालती दिसली रे दिसली कीं तो तिच्या मागें धांवायचा आणि जोंपर्यंत खाऊ मिळत नसे तोंपर्यंत तो तिला सोडीत नसे.

एके दिवशीं नेहमीच्या वेळेस मंगल दिसला नाहीं. तिनं गोदूला विचारलं तेव्हां कळलं कीं तो आजारी झाला. घाबरून मालती म्हणाली—ताप आला मग कां नाहीं कळवलं मला?

चल पाहूं!—

मंगल खाटेवर निपचित पडलेला होता. खोलींत अंधार होता, ओलावा होता, आणि थंडीचे दिवस असूनहि खूप डांस होते. मालती एक मिनिट तिथें थांबू शकली नाहीं. थर्मामिटर आणून तिनं ताप मोजला. १०४ डिग्री होता !

त्याच वेळेस मंगलनें डोळे उघडले. मालतीला समोर बघून तिच्या कडेवर जाण्याकरतां त्यानं हात पसरले. मालतीनें त्याला उचलून घेतलें. मालतीच्या गळ्यांत मोत्याची माळ होती. ती दोन्ही गरम झालेल्या हातांत धरून तो ओढूं लागला. तिनें माळ काढून त्याच्या गळ्यांत घातली. माळ मिळाल्यावर मालतीच्या कडे-वर राहण्याची त्याला जरूरी वाटली नाहीं. उलट मालती माळ हिसकावून घेईल अशी भिति वाटली. अशा वेळेस आईची कुशी त्याला जास्त सुरक्षित वाटली.

मालती म्हणाली, लबाड लेकाचा ! माळ घेऊन पळून गेला काय ! मंगलनें हार दोन्ही हातांत घट्ट धरून ठेवला आणि रोषानं आई कडे पाहिलं. —

मालती हंसून म्हणाली राहूं दे रे ! नाहीं मागत मी—

आपली उठण्याबसण्याची खोली साफसूफ करून तिथं मंगलला नेऊन निजवलं तेव्हां आश्चर्यानं मंगल त्या राजशाही खोलींकडे बघूं लागला. डोक्यावर छताला पंखा लावलेला होता. भिंतीवर नाना-प्रकारच्या तसबीरी होत्या. विजेचे रंगीत दिवे होते—ह्या सर्व चिजा त्याला नवीनच असल्यामुळें किति तरी वेळ तो त्यांकडेच बघत राहिला होता.

गोदूला आपल्या घरचं सर्वच काम करावं लागत असे. त्यामुळें फुरसद मिळत नसे. रात्रीची शिळी भाकरी खाऊन ते दोघं कसा

बसा दिवस काढीत असत. संध्याकाळीं मालती येई तेव्हां गोदू स्वयंपाकाला लागत असे. मालती मंगलजवळ बसून राही.

गोदूला फार फार वाटे कीं मंगलला आपल्या कुशींत घ्यावं पण मालती तिला जवळहि जाऊं देईना. त्याचं जें कांही करावयाचं तें ती स्वतःच करीत असे. रात्रीं ताप फार वाढे. मंगल दुःखानें जोर जोरानें रडूं लागे. मालती त्याला उचलून खांद्यावर घेई आणि चार चार तास त्याला हिंडवी. चार दिवसांनीं त्याच्या अंगावर देवीचे फोड उठूं लागले. प्रथम अगदी लहान होते. मग दाण्याएव्हढे झाले. एक दोन दिवसांनीं तर ते आवळ्यांएव्हढे प्रचंड झाले. मालतीनें घरांतल्या सर्व लोकांना देवीची लस टोचून घेतली—गडी माणसापासून तों स्वतःपर्यंत.

मंगलला मालती म्हणजे जीव कीं प्राण होती. मालती डोळ्यांआड व्हावयाचा उशीर मंगलनें रडावयास सुरवात केलीच! ती जवळ आली म्हणजे तो थांबून जायचा त्यामुळें रात्रंदिवस मालतीलाच त्याची निगा राखावी लागली. पण ती कधीं चिडली नाहीं. कधीं कंटाळली नाहीं.

गोदूला दोन मुलं होऊनहि मुलाचं पालनपोषण कसं करावं हें तिला मुळीच कळलं नव्हतं. दुःखानें बेजार होऊन रडूं लागला म्हणजे ही त्याला रागें भरायची. थोडासा वेळ मिळाला कीं तिथंच जमीनीवर पडायची. झोपी जायची, ऊठायची ती सकाळींच

झूमरूला त्या खोलींत जायचं भयच वाटे. मालती तिथं बसलेली असतांना नोकरमाणसांनीं कसं जायचं! बाहेरच्या बाहेर गोदूला हालहवाल विचारून घेई, आणि ओट्यावर पडून राही. त्या लागलेल्या मारांतून अजून पुरा दुरुस्त झाला नव्हता तो. गोदू कमावीत होती तेव्हां त्याला आराम मिळाला होता, पण नवीन नोकरी

घरल्यापासून विश्रांती कशी ती मिळालीच नव्हती. थोडंस काम केलं तरी तो सहज थकून जाई—

दोन आठवड्यांनंतर मंगल बरा झाला. देवीचे वण साऱ्या अंगावर होतेच. मंगल दुखण्यांतून सहिसलामत सुटला म्हणून मालतीनें त्या दिवशीं गल्लींतल्या मुलांना खूप मिठाई वाटली. तिला इतका आनंद झाला होता कीं, जणुं काय तिचाच मुलगा जबर दुखण्यांतून उठला होता. त्या दिवशीं तिला त्यागाची खरी किंमत कळली. दुसऱ्यांची सेवा करण्यांत जो आनंद तिला झाला, तो स्वतःच्या विलासी जीवनांत तिला कधीं लाभला नव्हता ? एका लहान बालकानं तिच्या जीवनाचा पथ आमूलाग्र बदलून टाकला होता !

## ११

तोताची परिस्थिति दिवसेनदिवस खालावतच गेली. जीवनाची लढाई तो हरला होता. जें जें त्यानं केलं, तें कधींच सफल झालं नव्हतं ! पण शक्ति होती तोपर्यंत इर्ष्येनें तो लढतच राहिला होता. आतां त्याचा आत्मविश्वास ढांसळला होता, ईर्ष्या विराम पावली होती. त्याच्या जीवनांत कोणतीच अभिलाषा पुरी झाली नव्हती. आणि केव्हांतरी आपलें नशिब फिरेल, अन् आपल्याला चांगले दिवस येतील, या आशेचा चक्काचूर झाला होता.

तीन बिघे जमीन, म्हणजे त्याचा प्राण होता. वाटेल तें कृत्य करावं लागलं, ते त्यानं बेदरकारपणें केलं. पण जमीन हातची जाऊं दिली नाहीं. कर्ज काढावं लागलं अपमान सहन केले, मजुरी केली

... वाचनालय,



आणि कित्येक वेळां तर अर्धपोटींहि राहिला, पण जमिनीला, शेतकऱ्यांच्या प्राणाला, धक्का लागूं दिला नाहीं.

पण आतां तो प्राणच निघून जाऊं पाहात होता. थांबून, थांबून किती दिवस सावकार थांबतील? तीनचार साल त्यांनी दम धरला होता, पण तोता रक्कम फेडूं शकत नाहीं, असें पाहून त्यांनी कोर्टांत दावा मांडला होता.

दाव्याचा फैसला होणार व उरलेली घर व शेती हातची जाणार हे लक्षांत येऊन त्याच्या नेत्रांत अश्रू येत होते. पण शेती वांचविण्याची आशा कोठूनच दिसत नव्हती. कर्ज कोण देणार? मुलगा असून नसलेला, आणि तो थकलेला——

हीच दशा अर्ध्या अधिक गांवाची होती! तो मनांतच समाधान करून घेत होता, जें त्यांचं होईल, तें आपलं? चिंता करून काय फायदा?——

ह्या चिंतेत भर घालण्याकरतां, आणखी एक काळजी उत्पन्न झाली होती.

रामसेवक या नांवाचा एक श्रीमंत मनुष्य होता. वय साधारण चाळीस पर्यंत. तोतापेक्षां दोनचार वर्षांनीं कमी, अंगानें चांगला मजबूत केस पिकलेले, पण चर्येवर अजूनहि जोष होता. तोता तर त्याच्या समोर अगदींच म्हातारा दिसत होता. पंडीत दातादीनची नी रामसेवकाची चांगली दोस्ती होती. दातादीन एके दिवशीं तोताकडे आला नी म्हणाला 'कायरे' काय झालं दाव्याचं?——

त्यांना बसण्याकरतां खाट टाकीत तोता दुःखी स्वरांत म्हणाला 'काय व्हायचं पंडित! रक्कम घेतली, फेडली नाहीं. त्या बद्दल फैसला होणारच!——'

'पण शेती वाडी तर वांचवली पाहिजेना! बापजाद्यांपासून चालत आलेली जैजात अशी हातोहात कां सोडायची!'

तें सारं कांहीं ईश्वराधीन आहे पंडीत! माणसाची हद्द संपली!

नाहींरे एक उपाय आहे. बघ अनुमति देशील तर तुझं कल्याण होईल!—

निराश झालेल्या तोताच्या हृदयांत आशेची चेतना आली. पंडीतचे पाय धरीत म्हणाला बोला पंडीत! तुमच्याशिवाय तारणार कोणीच नाहीं—

पंडीत हळूच म्हणाला—रामसेवकाला तर तूं ओळखतोसच! इस्टेट आहे, पैसा आहे, जमनिजुमला आहे. पुष्कळ दिवस झाले त्याच्या बायकोला मरून. संतान कांहींच नाहीं. बघ, रुपाचा विवाह करून टाकशील तर तूं सहज तरून जाशील! माझ्या म्हणण्याबाहेर नाहीं जायचा तो! तूं हो म्हण आतां त्याला राजी करतों.

तोता चूप बसला. रुपासारख्या अल्लड मुलीला एका चाळीस वयाच्या बुढ्याला द्यावयाचा प्रस्ताव त्याला अपमानकारक वाटला पण आज त्याचे ग्रह फिरले होते म्हणून अशी गोष्ट ऐकण्याचं दुर्भाग्य त्याच्या नशिबीं होतं. तोतानं उत्तराला वेळ मागून घेतला, आणि मान घालून बसून राहिला.

धनी प्रथम खळबळून उठली आणि शिव्या देऊं लागली. दोन-तीन दिवस दोघेहि नवरा-बायको मनांत विचार करीत होते. तोता जसजसा विचार करूं लागला, तस तसं त्याचं मन विवाहानुकूल होऊं लागलं! असाध्य रोग झालेला मनुष्य ज्याप्रमाणें खाण्यापिण्याची पर्वा करीत नाहीं तद्वत आयुष्याच्या शेवटच्या घडीला, निराश झालेला मनुष्य अब्रूची पर्वा करीत नसतो. त्यानें विचार केला 'मरण

कोणाच्या स्वाधीनचें नाहीं. वेळवखत आली तर तरुण मरून जातात पण म्हातारे जिवंतच राहतात. रुपाचं भाग्य बलवत्तर असेल तर तिथेंहि ती सुखी होईल. कोणी सांगावं नाहीं म्हणून !—'

घरांतली हालत घरधनीणीला चांगलीच माहित असते. मुलीच्या विक्रीचा सवाल निघाला म्हणून क्षणभर धनिया चिडून उठली. पण स्वतःचं दुर्भाग्य आठवून हळूहळूं शांत होऊं लागली. अखेर नशिबा-वर व देवावर हवाला सोडून तिनं सम्मती दिली.

लग्नाचा मुहूर्त ठरविण्यांत आला. झुमरूला चिठ्ठी गेली. मालतीनें तावडतोब परवानगी दिली. बरोबर भेट दिली आणि लग्नवेळीं स्वतः यावयाचं आंमत्रण दिलं.

तिघेहि घरीं पोंहचलीं.

घरची दशा पाहून झुमरु तर निराशच झाला. घरची अर्धी अधिक बाजू पडायला आली होती. अंगणांत एकच बैल आणि तोहि मरा-यला टेकलेला, आईबाप थकून गेलेलीं, धड वस्त्र नाहीं, धड खाद्य नाहीं. हीच स्थिति साऱ्या गांवची. जिकडे तिकडे पडझड, उपासमार, दारिद्र्य, कोणाच्याच चर्येवर आशा नाहीं, तेज नाहीं. त्या मानानें तो किती सुखी होता ! गुलामी करीत होता पण ती एका मालकाची. शेतकरी गुलाम नव्हते खरं ! पण गुलामापेक्षांहि वाईट हाल होते. आपण मर मर मरून पिकवावयाचं, आणि सरकार सावकारांची घरें भरायचीं ! जीवनाचा आस्वाद नाहीसा झालेला, जें समोर येईल तें विचारपूस न करतां कसं तरी पोटांत ढकलायचं ! अन्नान्न दशेमुळें, इज्जत, लाजशरम, सारी लोपलेली, घेल्याकरतां लाठी चालवून घ्यावी, खून करवून घ्यावे !—

लहानपणापासून झुमरु हेंच बघत आला होता. पण शहरांत राहिल्यामुळें त्याची बुद्धि विकसित झाली होती. शहरांत मोठ-

कोणाच्या स्वाधीनचें नाहीं. वेळवखत आली तर तरुण मरून जातात पण म्हातारे जिवंतच राहतात. रुपाचं भाग्य बलवत्तर असेल तर तिथेंहि ती सुखी होईल. कोणी सांगावं नाहीं म्हणून !—'

घरांतली हालत घरधनीणीला चांगलीच माहित असते. मुलीच्या विक्रीचा सवाल निघाला म्हणून क्षणभर धनिया चिडून उठली. पण स्वतःचं दुर्भाग्य आठवून हळूहळू शांत होऊं लागली. अखेर नशिबा-वर व देवावर हवाला सोडून तिनं सम्मती दिली.

लग्नाचा मुहूर्त ठरविण्यांत आला. झुमरूला चिठ्ठी गेली. मालतीनें ताबडतोब परवानगी दिली. बरोबर भेट दिली आणि लग्नवेळीं स्वतः यावयाचं आंमत्रण दिलं.

तिघेंहि घरीं पोंहचलीं.

घरची दशा पाहून झुमरु तर निराशच झाला. घरची अर्धी अधिक बाजू पडायला आली होती. अंगणांत एकच बैल आणि तोहि मरा-यला टेकलेला, आईबाप थकून गेलेलीं, धड वस्त्र नाहीं, धड खाद्य नाहीं. हीच स्थिति साऱ्या गांवची. जिकडे तिकडे पडझड, उपासमार, दारिद्र्य, कोणाच्याच चर्येवर आशा नाहीं, तेज नाहीं. त्या मानानें तो किती सुखी होता ! गुलामी करीत होता पण ती एका मालकाची. शेतकरी गुलाम नव्हते खरं ! पण गुलामापेक्षांहि वाईट हाल होते. आपण मर मर मरून पिकवावयाचं, आणि सरकार सावकारांची घरें भरायचीं ! जीवनाचा आस्वाद नाहीसा झालेला, जें समोर येईल तें विचारपूस न करतां कसं तरी पोटांत ढकलायचं ! अन्नान्न दशेमुळें, इज्जत, लाजशरम, सारी लोपलेली, धेल्याकरतां लाठी चालवून घ्यावी, खून करवून घ्यावें !—

लहानपणापासून झुमरु हेंच बघत आला होता. पण शहरांत राहिल्यामुळें त्याची बुद्धि विकसित झाली होती. शहरांत मोठ-

...श होऊन त्याचं हृदय विशा...

तोता कांहीं काम स्वतः करूं लागला म्हणजे तो स्वतः पुढें होई अन् त्यांना दूर सारून स्वतः करूं लागे. जणूं काय गतकाळांत केलेल्या दुर्वर्तनाचं प्रायश्चित्तच घेत होता.

तो वडिलांना म्हणे 'दादा, तुम्हीं आतां थकलां आहांत, राम राम करीत पडून राहा. मी महिनेच्या महिने खर्चाला धाडून देत जाईन आणि असं करूं देण्याचे किस्ते पाडूं. आणि नेमानें फेडत जाऊं—'

पण तोताला तें मान्य होईना. तो म्हणे 'नाहीं रे! तूं कां सर्व बोजा उचलतोस? असा किती पगार मिळतो तुला, कीं घरखर्च करून मला पाठविणार! मीच बघून घेईन. तूं नकोस काळजी करूं—

विवाह थाटामाटांत पार पडला. दोन्हीकडचा खर्च रामसेवकने केला होता. पंडीतजींनी कबूल केल्याप्रमाणें २०० रुपये तोताच्या हातांत ठेवले. ते घेतांना त्याचा हात थरथरत होता. आणि शरमेनें त्याचा जीव अर्धमेला झाला होता.

× × ×

झुमरु दोन तीन दिवस राहिला. नोकरी असल्यामुळें जाणं भाग होतं. आपल्या नम्र स्वभावानें व गोड वाणीनें त्यानें सर्व खेडेगावांत प्रेम उत्पन्न करून ठेवलं होतं! असं घर नव्हतं कीं जिथं तो आठवण सोडून गेला नव्हता.

...म्हणाला — यांत कसलं पाप आलं दादा! अपराध माझा. मोठा, कमावता मुलगा असून तुमच्या कांहीं कामास आला नाहीं, याला तुम्हीं काय करणार? हां त्याचे २०० रुपये मात्र परत करावयास पाहिजे—

गोदूला धाडायला धनी तयार नव्हती. तिचीहि इच्छा अजून कांहीं दिवस रहवयाची नव्हती. म्हणून झुमरु एकटाच गेला.

जातांना तोता गांवच्या सीमेपर्यंत पोहोंचवायास गेला. निरोप-द्यावयची वेळ आली आणि झुमरु पायां पडला तेव्हांतर तो रडूं लागला. त्याला वाटलं कीं झुमरूची आपली ही शेवटचीच भेट आहे.

रुपा लहान असली तरी समंजस होती, वडिलांची आईची अभिलाषा पुरी करावयाच्या इतकी तिची गृहपरिस्थिती चांगली समृद्ध होती. एके दिवशीं तिनें घरधन्याला विचारून एक चांगली गाय वडिलांकडे पाठवून दिली.

तोताला गाईची जरूर होती. मंगल त्यांचा जीव कीं प्राण होता. तो जोंपर्यंत त्याच्या जवळ राहणार होता, तोंपर्यंत त्याला दूध नको कां मिळायला? पण रक्कम आणायची कुठून?—

नशिबानें हात दिला. त्याच दिवसापासून नजीकचं सडकेचें काम सुरू होणार होतं. तोताला कळतांच त्यानं आठ आणे प्रमाणें मजुरी पत्करून काम करावयाचं ठरविलं. त्याचा हिशोब असा कीं

दोन महिने काम चाललं, तर गाय घेण्याइतके रुपये सहज जमा होईल.

त्या अदम्य उत्साहाच्या भरांत तो दिवसभर खोदकाम करीत असे व रात्रीं दोनवाजेपर्यंत सुतळी विणीत बसे. धनीसुद्धां त्याला आडथळा करण्या ऐवजीं मदतच करीत होती.

रामसेवकचे रुपये द्यावयाचे होते, गाय घ्यावयाची होती. त्यांचा प्राणप्रिय मुलगाच सांगून गेला नव्हता काय?

मग रात्रीं जागून काम करण्याव्यतिरिक्त दुसरा इलाज काय!

एके दिवशीं सकाळीं तो उठला. बाहेर आला, पाहतो तो हिरा समोर उभा. दाढी केस खूप वाढलेले, कपड्याचीं लक्तरें झालेलीं, देह, चर्या सुकून कोळ झालेली, जणू काय शरीरांत रक्त आणि मांस उरलच नव्हतं! उरलं होतं काय ती हाडें. तोताला बघतांच त्यानं त्याच्या पायावर लोटांगण घातलं

तोतानें त्याला उठवून आलींगन दिलं, विचारलं 'बेटा, कुठंरे गेला होतास इतकें दिवस? तुझी सारखीं आठवण येत होती—'

तोताच्या डोळ्यांसमोर त्याच्या गाईला विष देणारा, त्याचा मत्सर करणारा व प्रत्यहि भांडणारा हिरा उभा नव्हता. तर लहानपणीं पोरका झालेला आणि त्यानच पालन केलेला बच्चा हिरा उभा होता. जणू काय मधलीं वीस-पंचवीस वर्षं गायब झालीं होती!

हिरा रडतच होता. तोतानें त्याचं सांत्वन करीत विचारल, 'कां रडतोस रे? अरे मनुष्याच्या हातून चूक-भूल होतेच—'

बिचारा हिरा; पळून गेला. पण ज्या गुन्ह्यापासून पळून जावयाची इच्छा होती, तो गुन्हां कांहीं त्याच्या मनांतून गेला नव्हता. रात्रंदिवस त्या मेलेल्या गाईचं चित्र त्याच्या नेत्रांसमोर उभंच असे. एक क्षणहि तिनं उसंत दिली नाहीं. त्याला वेड लागलं. पांच वर्षं

वेड्यांच्या अस्पीतळात काढलीं. पांच महिन्यापूर्वी सुटला. आणि भिकमागून गुजराणा करीत इंथ आला. आतां तो तोताची क्षमा चाहत होता. आणि मरेपर्यंत त्याची सेवा करणार होता.

तोताचा जीव प्रसन्न होता मुलगा भेटला, भाऊ भेटला, सारी संकट दूर झालीं.

त्या दिवशीं तो कामावर गला, तेव्हां त्यांचा देह रात्रभर जगण्यानें थकून गेला होता. दहावाजेपासून ऊन तळपूं लागलं होतं. बारा वाजतां तर जणूं काय आगच लागली होती. उनकं उन तेज होंत. जेवण्याची छुट्टी झाली तेव्हां तो इतका थकला होता कीं पाय सुद्धां उचलत नव्हते. त्यानं अंघोळ केली नाहीं, रोटी खाल्ली नाहीं, तसाच एका झाडाच्या सांवलीत पडून राहिला. त्याचा जीव घाबरूं लागला. घसा सुकून आंकसून गेला. त्याच्या जवळ एक मजूर भाकरी खात होता. त्याला त्यानं पाणी मागितलं.

पाणी पीत नाही तोच त्याच्या समोरचं जग फिरूं लागलं हातपाय थंड पडलें, आणि जीवनांतलीं नाना चित्रें त्याच्या नेत्रांसमोर उभीं राहीलीं.

तोता लहान होता, आणि साऱ्या गल्लींत खेळत होता, तो झुमरू पाया पडतो आहे. तेव्हढ्यांत दृष्य बदललं एक सुंदर कामधेनू समोर उभी राहीलीं. त्यानें दूध काढलं आणि मंगलला प्यायला दिलं तोच त्या कामधेनूची देवी झाली.

तोताला उन लागलं होतं. मनुष्य दौडत घरीं गेला, धनिया धांवत आली आणि मागून हिरा आणि शोभा डोली घेऊन आलें.

धनीनें त्याला विळखा घातला, कातर स्वरांत विचारलं कसं वाटतं तुम्हांला——

तोतानें अस्थिर नेत्र उघडून बघितलें म्हटलें ! झुमरू आलास तूं ! मंगल करतां गाय घेतली मी ती उभी आहे बघ !

धनीला मृत्यूची लक्षणें माहीत होती. तिच्या जिवनांत किती तरी मृत्यु तिनं बघितले होते. त्याला ऊन लागलें म्हणून तो बेशुद्ध आहे हे तिनें जाणलें. मोठं धैर्यधरून त्यानी त्याला डोलीत बसून घरीं नेलं,

गावांत बातमी पसरली. सर्व गांवकरी गोळा झाले. तोता खाटेवर पडून सर्वांकडे क्षीण नजरेनें बघत होता. त्याला सर्व समजत होतं पण वाचा बंद झाल्यामुळें बोलतां येत नव्हतं :

घनी सर्व समजून चुकली होती. तिच्या नेत्रांतून सारखे अश्रू वहात होते.

हिरा रडतच म्हणाला 'वैनी' धैर्य धर, गोदान कर, दादा चालले.

इतर गांवकऱ्यांनी साथ दिला हा ! गोदान करो हिच वेळ आहे. धनीया हिमत करून उठली. आजच सुतळी विकून रुपयें आले होते ते घेऊन आली. आणि ते रुपये तोताच्या हातांत दाबून धरीत म्हणाली——

महाराज घरांत गाय नाहीं, गाई इतकें पैसेहि नाहींत दे जे कांहीं आहे हेच त्याचं गोदान !——

आणि बोलतां बोलतां बेशुद्ध होऊन तोताच्या अंगावर पडली.

१६८।२।—
व. २।
नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत